सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १

# मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३

(दिनांक ३० जानेवारी, २००६ पर्यंत सुधारित)

THE BOMBAY ACT No. I OF 1923

# THE BOMBAY ENTERTAINMENT DUTY ACT, 1923

*(As modified upto 30th January 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत रु. ९.०० ]

# मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९५१

## अनुक्रमणिका

पृष्ठ

उद्देशिका

कलमे


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व अंमलात येणे. | ४ |
| २. | व्याख्या | ४ |
| ३. | करमणुकीच्या स्थानात प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पैशावर शुल्क. | १३ |
| ३कक. | प्रवेशासाठी दिलेल्या रकमेवरील किंवा ठोक शुल्कावरील अधिभार. | ३० |
| ३क. | मानार्थ तिकिटांवर शुल्क. | ३१ |
| ४. | वसुलीची रीत. | ३३ |
| ४क. | १ मे, १९६० नंतर विवक्षित कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या मुंबई सरकारच्या मुद्रांकांचा उपयोग करणे. | ३३ |
| ४ख. | करमणूक शुल्काचे निर्धारण. | ३३ |
| ४ग. | व्हिडिओ खेळघरातील यंत्र चालू नसेल आणि अनुत्पादक अवस्थेत असेल त्याबाबतीत माफी किंवा परतावा देणे. | ३४ |
| ४घ. | गो-कार्टींग केंद्रातील चालू नसलेल्या किंवा उत्पन्न न मिळणा-या कारच्या बाबतीत सूट किंवा परतावा. | ३५ |
| ४ङ. | जाहीर लिलाव किंवा एजंट या मार्फत केबल दूरचित्रवाणीवरील शुल्काची वसुली. | ३५ |
| ५. | कलम ४ चे अनुपालन न केल्याबद्दल शिक्षा. | ३६ |
| ५क. | इतर तरतुदींचे अनुपालन न केल्याबद्दल शिक्षा. | ३६ |
| ६. | धर्मादाय किंवा शैक्षणिक प्रयोजनांसाठी असलेल्या करमणुकींच्या बाबतीत सूट, राज्य शासनाने दिलेले सूट. | ३६ |
| ७. | नियम करण्याचा अधिकार. | ३७ |
| ८. | या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता करमणुकींच्या स्थानात प्रवेश करण्याचा अधिकार. | ३८ |
| ९. | वसुली. | ४० |
| ९क. | अपराध आपसात मिटविणे. | ४० |
| ९ख. | शुल्क आणि आपसमेळाची रक्कम देण्यात कसूर केल्याबद्दल देय असलेले व्याज. | ४१ |

## अनुक्रमणिका—चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| ९ग. | दिलेल्या अतिरिक्त शुल्काचा परतावा. | ४९ |
| ९घ. | लायसन निलंबित किंवा रद्द करण्यासाठी शिफारस करणे. | ४१ |
| १०. | राज्य शासनाकडून अधिकारांचे प्रत्यायोजन. | ४१ |
| १०क. | अपील व पुनरीक्षण. | ४१ |
| ११. | विवक्षित कार्यवाहीस रोध. | ४२ |
| १२. | मुदत मर्यादा. | ४२ |
| १३. | स्थानिक प्राधिकरणांनी करमणुकींवर कर बसविण्यास मनाई. | ४३ |
| १४. | निरसन व व्यावृत्ती. | ४३ |
| अनुसूची— | | ४४ |

## [ सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक एक ][1]

## [ मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३. ]*

[ या अधिनियमास, गव्हर्नर जनरल यांची अनुमती मिळाल्यानंतर तो मुंबई शासन राजपत्रात दि. १३ जानेवारी, १९२३ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आला. ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याद्वारे अनुकूलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६.

सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३.

सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३.

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.

सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३.

सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७. †

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३७.

विधि अनुकूलन आदेश १९५०.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५६.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता सन १९२२ चे मुंबई शासन राजपत्र, भाग ५ (इंग्रजी) पृष्ठ १७७ पहा. प्रवर समितीच्या अहवालाकरिता उपरिनिर्दिष्ट वर्षाच्या राजपत्रातील (इंग्रजी) पृष्ठे २४४-२४५ पहा आणि विधान परिषदेतील कामकाजाकरिता मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सील डिबेट्स १९२२, खंड सात पहा.

* सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, हा अधिनियम, मुंबई राज्याच्या ज्या भागात लागू नव्हता त्या भागास लागू करण्यात आला. (पहा : सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम २).

† हा अधिनियम निरसित करण्यात आला व पुन्हा अधिनियमित करण्यात आला आहे आणि उक्त अधिनियमाचे कलम ९ व अनुसूची 'फ' या अन्वये केलेल्या सुधारणा, सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५२, कलम २ अन्वये अंमलात ठेवल्या आहेत.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, (१-५-१९७४) §

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७७, (१-४-१९७६) §

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, (१-११-१९७६) §

सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, (१-१-१९८४) §§ **

सन १९८७ *** चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ‡

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० ‡

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ ‡

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ‡

सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ ‡*

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ ‡

---

§ याद्वारे अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविण्यात आली आहे.

§§ सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम १३ अन्वये, १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

** या अधिनियमाचे कलम ११ पुढीलप्रमाणे आहे :—

व्यावृत्ती :"११. या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही व्यक्ती, १ जानेवारी, १९८४ रोजी सुरू होणाऱ्या आणि हा अधिनियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी संपणाऱ्या मुदतीमध्ये तिने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधातील अपराधाबाबत दोषी ठरविली जाण्यास पात्र होणार नाही; मात्र असे कृत्य किंवा वर्तन हे या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणा नसतांना, मुख्य अधिनियमाखालील अपराध असता कामा नये ; तसेच कोणत्याही व्यक्तीला अशा कृत्याबद्दल किंवा वर्तनाबद्दल अशा प्रसिद्धीच्या तारखेच्या लगतपूर्वी अंमलात असणाऱ्या कायद्यानुसार जी शास्ती झाली असती त्यापेक्षा अधिक शास्तीस ती आधीन असणार नाही.

*** सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ च्या कलम १७ अन्वये १९८७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १ निरसित करण्यात आला.

सन १९९८ £ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ‡

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ‡

सन २००० ££ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ ‡

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ‡

सन २००२ §§ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ ‡

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ‡

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

---

‡ याद्वारे अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविण्यात आली आहे.

£ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० च्या कलम ५ अन्वये १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ निरसित करण्यात आला.

££ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ५ अन्वये १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २४ निरसित करण्यात आला.

§§ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ च्या कलम ४ अन्वये २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ..... निरसित करण्यात आला.

## मुंबई [१][राज्यात]करमणुकीच्या स्थानात प्रवेश देण्यावर शुल्क लादण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** मुंबई [१][ राज्यात ] [२][ करमणुकीच्या कार्यक्रमांना ] प्रवेश देण्यावर शुल्क बसविण्याची तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व अंमलात येणे.

१. (१) या अधिनियमास मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ असे म्हणावे.

[३][ (२) तो संपूर्ण [४][ महाराष्ट्र राज्यास ] लागू आहे.]

[५][ (३) तो, १ जानेवारी, १९८४ रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.]

**व्याख्या.**

२. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात—

[६][ (क-१) " मनोरंजन उद्यान " याचा अर्थ, जेथे, प्रवेश शुल्क दिल्यावर, खेळ किंवा सवा-या यांसह किंवा या दोहोंसह [७][ परंतु चलत्चित्रकाद्वारे व व्हिडिओद्वारे करण्यात येणारे प्रदर्शन वगळून ] मनोरंजनाच्या निरनिराळ्या प्रकारांची जवळजवळ कायम स्वरूपात तरतूद केलेली असते, असे ठिकाण;

(क-२) " ॲन्टेना " याचा अर्थ, प्रेक्षकांना उपग्रहाद्वारे केल्या जाणा-या राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय प्रक्षेपणांसह इतर प्रक्षेपणांचा लाभ ज्यांच्या द्वारे घेता येतो ते दूरचित्रवाणीचे संकेत ग्रहण करणारे आणि जोडणीधारकाने कोणतेही अंशदान किंवा वर्गणी किंवा (उपकरण) बसवण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा इतर कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार भरल्यानंतर वर्गणीदाराचा दूरचित्रवाणी संच निवासी किंवा निवासेतर ठिकाणी धातूच्या को-ॲक्शिअल केबलने किंवा ऑप्टिक फायबरच्या केबलने " हेड एन्ड " या नावाच्या मध्यवर्ती यंत्रणेशी जोडलेला असतो तेथे तारेतून पाठवल्या जाणा-या दूरचित्रवाणीच्या संकेतांच्या सहाय्याने चित्रपट किंवा हलती चित्रे किंवा चित्रपट मालिका प्रदर्शित करण्यासाठी उभारण्यात येते किंवा बसवण्यात येते ते उपकरण, असा आहे;]

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(अ) अन्वये ' इलाख्यात ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे ' मुंबई राज्यास ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये मूळ पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(१) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम २(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][ (क) " करमणूक " या संज्ञेत, ज्यात पैसे घेऊन व्यक्तींना प्रवेश देण्यात येतो असे कोणतेही प्रदर्शन, प्रयोग, मनोरंजन, खेळ किंवा क्रीडा [२][ अथवा, दूरचित्रवाणीच्या बाबतीत, अंशदान किंवा वर्गणी किंवा बसवण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा इतर कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार म्हणून ज्यासाठी व्यक्तींना पैसे भरावे लागतात अशा, केबल नेटवर्कला जोडलेल्या कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या ] [३][ किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेच्या (Direct-to-Home (DTH) Broadcasting service)] मदतीने केल्या जाणा-या प्रदर्शनाचा समावेश होतो; [४][ पण खेळ व सवा-यां सह मनोरंजनाच्या तात्पुरत्या ] [५][ आणि जादूच्या प्रयोगाचा समावेश होत नाही; ]

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनासाठी,-

[६][ (एक) " प्रदर्शन " या शब्दप्रयोगामध्ये, व्हिडिओद्वारे केले जाणारे प्रदर्शन किंवा केबल नेटवर्कला जोडलेल्या कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या मदतीने केले जाणारे दूरचित्रवाणी प्रदर्शन यांसह चलचित्रकाद्वारे करण्यात येणा-या कोणत्याही प्रदर्शनाचा समावेश होतो; ]

(दोन) " खेळ " या संज्ञेत करमणुकीच्या प्रयोजनार्थ किंवा अन्यथा जे व्हिडिओ खेळ, इलेक्ट्रॉनिक्सच्या सहाय्याने किंवा यंत्राच्या सहाय्याने किंवा विद्युत यांत्रिकीच्या सहाय्याने खेळले जातात, त्या व्हिडिओ खेळांचा समावेश होतो; [७][ आणि, ]

[८][ (तीन) " तात्पुरते मनोरंजन " या शब्दप्रयोगाचा अर्थ, कलम २ च्या खंड (क-१) मध्ये आणि कलम ३, पोट-कलम (५) मधील खंड (ख) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे मनोरंजन उद्यानामध्ये असतात त्याप्रमाणे जवळ जवळ कायम स्वरूपात तरतूद केल्याप्रमाणे नसतील अशा मनोरंजन सवा-या व खेळ, असा आहे.]

[९][ (क-क१) " बोलींग ॲली " म्हणजे, जीमध्ये एखाद्या वस्तूकडे किंवा वस्तूंच्या किंवा खुंट्यांच्या (पिन्स) समुहाकडे एखाद्या मर्यादित जागेमधून चेंडू सरपटत फेकून मारणाच्या अनेक खेळांपैकी, कोणताही खेळ खेळण्याकरिता, एक किंवा अनेक लाकडी मार्ग (लेन) किंवा अन्य कोणत्याही सामग्रीपासून बनविलेले एक किंवा अनेक मार्ग असतील अशी इमारत किंवा ज्यामध्ये अशा खेळासाठी एक किंवा अनेक लाकडी मार्ग किंवा अन्य कोणत्याही सामग्रीपासून बनविलेले एक किंवा अनेक मार्ग असतील असे बंदिस्त मैदान किंवा मैदानाचा भाग, असा आहे.]

---

[१]सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (क)हा दाखल करण्यात आला.

[२]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(२)(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४]हा मजकूर सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५]हा मजकूर सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम २(२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(ब) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (एक) दाखल करण्यात आला.

[७]सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २(ब)(दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८]सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २(ब)(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[९]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २(एक) अन्वये १ एप्रिल, २००० पासून हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१][ (कक) " केबल दूरचित्रवाणी " याचा अर्थ, जोडणीधारकाने कोणतेही अंशदान किंवा वर्गणी किंवा बसवण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार भरल्यानंतर, व्हिडिओ कॅसेट किंवा डिस्क किंवा दोन्ही, रेकॉर्डर किंवा प्लेअर किंवा ज्यावर आधी ध्वनिचित्रीत केलेली व्हिडिओ कॅसेट किंवा डिस्क किंवा दोन्ही दाखवण्यात अथवा पुन्हा दाखवण्यात येतात असे त्याच प्रकारचे उपकरण यांचा वापर करून, वर्गणीदाराचा दूरचित्रवाणी संच तांब्याच्या को-ॲक्शिअल केबलने किंवा ऑप्टिक फायबर केबलने "हेड एन्ड" नावाच्या मध्यवर्ती यंत्रणेशी जोडलेला असतो तेथे तारेतून पाठवल्या जाणा-या दूरचित्रवाणी संकेतांच्या सहाय्याने चित्रपट किंवा हलती चित्रे किंवा चित्रपट मालिका प्रदर्शित करण्यासाठी चालू केलेली यंत्रणा आणि जोडणीधारकाच्या निवासाच्या किंवा निवासेतर ठिकाणी असलेल्या दूरचित्रवाणी ग्रहण संचावर पाहिले व ऐकले जाणारे चित्रपट किंवा हलती चित्रे किंवा चित्रपट मालिका, असा आहे; ]

[२][(ख) [३][करमणूक शुल्क बसवण्याच्या संबंधात] "प्रवेश मिळण्यासाठी द्यावयाचा पैसा " या संज्ञेत पुढील पैशांचा समावेश होतो,—

(एक) करमणुकीच्या स्थानाच्या एका भागात प्रवेश मिळाल्यानंतर ज्या स्थानाच्या दुस-या भागात प्रवेश मिळण्यासाठी शुल्क किंवा अधिक शुल्क यांसह पैसा घेतला जातो अशा दुस-या भागात ज्या व्यक्तीस मागाहून प्रवेश मिळाला आहे तिने दिलेला कोणताही पैसा;

(दोन) करमणुकीच्या स्थानात आसनांसाठी किंवा बसण्याच्या इतर जागेसाठी दिलेला कोणताही पैसा;

(तीन) करमणुकीचा कार्यक्रम किंवा त्याची रुपरेषा यासाठी दिलेला कोणताही पैसा;] [४][**]

[५][(तीन-क) ज्या कोणत्याही उपकरणामुळे किंवा साधनामुळे एखाद्या व्यक्तीस करमणुकीचा कार्यक्रम स्वाभाविकपणे किंवा अधिक चांगल्या रीतीने दिसू शकेल किंवा ऐकू येऊ शकेल व ज्याच्याअभावी अशा व्यक्तीस तो असा दिसू किंवा ऐकू येऊ शकणार नाही त्या उपकरणाच्या किंवा साधनाच्या उसनवारीबद्दल किंवा वापराबद्दल दिलेला कोणताही पैसा;] [६][***]

[७][(चार) एकतर करमणुकीकरिता प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पैशाबरोबर किंवा प्रवेशासाठीच्या अशा कोणत्याही पैशाव्यतिरिक्त, करमणुकीकरिता उपस्थित राहण्याची किंवा तेथे उपस्थिती चालू ठेवण्याची एक शर्त म्हणून, करमणुकीशी संबंध असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीस कोणत्याही स्वरुपात द्यावा लागतो, असा कोणत्याही नावाने संबोधला जाणारा कोणताही पैसा;

(पाच) व्हिडिओद्वारे प्रदर्शनास प्रवेश देण्याकरिता एखाद्या व्यक्तीकडून देण्यात येणारा कोणताही पैसा, मग त्या व्यक्तीला अशा पैशाच्या मोबदल्यात कोणतेही खाद्यपदार्थ किंवा पेये किंवा ही दोन्हीही पुरवण्यात येत असोत, किंवा नसोत]

---

[१]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १०, कलम २(ब) अन्वये खंड (क-क) हा समाविष्ट करण्यात आला.
[२]सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्र. १३, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.
[३]हा मजकूर सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ११, कलम ३(ब) (एक) अन्वये दाखल करण्यात आला.
[४]सन १९८४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ३(अ) अन्वये "आणि " हा शब्द वगळण्यात आला.
[५]सन १९८४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ३(ब) अन्वये उप्र-खंड (तीन-क) हा दाखल करण्यात आला.
[६]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ब) (एक) अन्वये "आणि " हा शब्द वगळण्यात आला.
[७]सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(ब) (दोन) अन्वये खंड (चार) च्या ऐवजी खंड (चार) व (पाच) जादा दाखल करण्यात आले.

[१][(सहा) केबल नेटवर्कला जोडलेल्या कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या मदतीने केल्या जाणा-या दूरचित्रवाणी प्रदर्शनासाठी एखाद्या व्यक्तीने अंशदान किंवा वर्गणी किंवा बसवण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा इतर कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार म्हणून दिलेला कोणताही पैसा ;] [२][ * * ] ;

[३][(सात) जोडणीधारकाच्या निवासी किंवा अनिवासी जागेतील दूरचित्रवाणी संच सॅटेलाईटशी थेट जोडणा-या कोणत्याही प्रकारच्या सेट टॉप बॉक्सच्या सहाय्याने किंवा तत्सम स्वरूपाच्या उपकरणाच्या सहाय्याने पुरवण्यात येणा-या थेट घरपोच प्रसारण सेवेसाठी ( Direct-to-Home (DTH) Broadcasting service ) थेट घरपोच प्रसारण सेवेच्या मालकास, एखाद्या व्यक्तीने, अंशदान, वर्गणी, (उपकरण) बसविण्याचा व जोडण्याचा खर्च किंवा इतर कोणत्याही प्रकारे वसूल करण्यात येणारे इतर कोणतेही आकार म्हणून दिलेला कोणताही पैसा ; [४][आणि]

[५][(आठ) तिकीट विक्री न करता केवळ निमंत्रितांसाठी आयोजिलेल्या कार्यक्रमांच्या बाबतीतील प्रायोजकत्वाच्या रकमेच्या स्वरूपातील कोणतेही प्रदान ;]

[६][**स्पष्टीकरण**.— या उपखंडाच्या प्रयोजनांसाठी, सहकारी गृहनिर्माण संस्था किंवा कोणताही कारखाना, हॉटेल, निवासगृह, पानगृह, (बार), परमिट रूम, पब यांचे व्यवस्थापन यांसह कोणत्याही सहकारी संस्थेकडून किंवा एखाद्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींच्या समुहाकडून, त्यांच्या सभासदांकरिता किंवा त्यांच्या कामगारांकरिता किंवा ग्राहकांकरिता किंवा तिच्या स्वतःकरिता किंवा यथास्थिति, त्यांच्या स्वतःकरिता कोणत्याही प्रकारच्या ॲन्टीना किंवा केबल नेटवर्कमार्फत प्रसारण मिळविण्याकरिता किंवा त्याला केबल दूरचित्रवाणी जोडण्यासाठी कोणतेही इतर उपकरण संच खरेदी करण्याकरिता कोणताही खर्च करण्यात आला तर तो केबल नेटवर्कला जोडलेल्या कोणत्याही प्रकारच्या ॲन्टीनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या मदतीने केल्या जाणा-या, दूरचित्रवाणीच्या मदतीने केल्या जाणा-या दूरचित्रवाणी प्रदर्शनासाठी या उप खंडाअन्वये दिलेला आकार असल्याचे समजण्यात येईल :]

परंतु, व्हिडिओ प्रदर्शनास प्रवेश देण्याकरिता मालक नियमित तिकिटे देत नसेल आणि व्हिडिओ प्रदर्शनास प्रवेश दिलेल्या व्यक्तींवर आकारलेल्या रकमेमध्ये, कोणत्याही खाद्यपदार्थाचा किंवा पेयांचा किंवा या दोन्हींचा समावेश असेल त्या बाबतीत, अशा रकमेच्या पंच्याहत्तर टक्के रक्कम ही, अशा प्रवेशाकरिता दिलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल :]

[७][परंतु, आणखी असे की, [८][कलम ३ च्या पोट-कलम (१३) च्या तरतुदींना अधीन राहून,] मालकाने सेवा आकारापोटी म्हणून प्रत्येक तिकिटामागे [९][साधारण व वातशीतल चित्रपटगृहाच्या बाबतीत तीन रुपयांहून आणि वातानुकूलित चित्रपटगृहाच्या बाबतीत चार रुपयांहून] अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, स्वतंत्रपणे आकारलेली असेल आणि मालक अशा सेवा आकाराची रक्कम, त्याने स्थायी सिनेमाची [१०][किंवा स्थायीवत सिनेमाची] देखभाल करण्याकरता व मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३ व महाराष्ट्र सिनेमा

१९५३ चा मुंबई ११.

[१]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(४) (अ) अन्वये उप खंड (सहा) समाविष्ट करण्यात आला.
[२]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २(क) अन्वये 'आणि' हा शब्द वगळण्यात आला.
[३]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (ब) (तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[४]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[५]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २ (ग) अन्वये हा उपखंड जादा दाखल करण्यात आला.
[६]सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (अ) अन्वये **स्पष्टीकरण** दाखल करण्यात आले.
[७]सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (४) (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[८]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[९]सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[१०]सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम २ (३) (अ) (दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(विनियमन) नियम, १९६६ किंवा त्या वेळी अंमलात असलेला कोणताही अन्य कायदा यांच्या तरतुदीअन्वये आवश्यक केलेल्या सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजनांव्यतिरिक्त आणखी जादा सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजना पुरविण्याकरता खर्च केली असल्याबद्दल या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये व्याख्या करण्यात आलेल्या विहित अधिका-याची खात्री पटेल अशा प्रकारे दाखवून देईल तर अशा सेवा आकाराचा, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पैशामध्ये समावेश केला जाणार नाही :]

[१][ परंतु तसेच, मालक प्रत्येक वर्षी ३० सप्टेंबर पूर्वी, दुस-या परंतुकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे देखभालीकरिता आणि सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजना पुरवण्याकरिता त्याच्याकडून गोळा केलेल्या व खर्च करण्यात आलेल्या सेवा आकाराचे परीक्षित लेखे विहित अधिका-यापुढे सादर करील. मालकाकडून ज्या वित्तीय वर्षामध्ये सेवा आकाराची रक्कम अशा रीतीने खर्च करावयाची राहिली असेल त्या वित्तीय वर्षाच्या लगत नंतरच्या [२][ चार वित्तीय वर्षांमध्ये ] सेवा आकाराची शिल्लक रक्कम हिशेबात पुढे धरण्याची परवानगी त्याला देण्यात येईल. हिशेबांचे अवलोकन केल्यानंतर, जर विहित अधिका-याची, अशी खात्री झाली की, मालकाला ज्या मुदतीसाठी सेवा आकाराची, शिल्लक रक्कम किंवा तिचा भाग हिशेबात पुढे धरण्याची परवानगी आहे त्या अनुज्ञेय मुदतीच्या अखेरीस त्याने ती रक्कम देखभालीसाठी व दुस-या परंतुकात तरतूद केल्याप्रमाणे सुविधा आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना पुरविण्यासाठी खर्च केलेली नाही तर अशा रीतीने खर्च न केलेली सेवा आकाराची किंवा त्याच्या भागाची उक्त रक्कम, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पैशामध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि त्यानंतर कलम ४-ब च्या पोट-कलम (२) ते (५) च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह या अधिनियमाच्या कलम ३ मधील पोट-कलम (१), खंड (क) मध्ये किंवा पोट-कलम (३), खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारण्याच्या प्रयोजनासाठी लागू होतील :]

[३][ परंतु असेही की, मालकाने एका वित्तीय वर्षात सेवा आकार म्हणून गोळा केलेल्या रकमेहून जादा रक्कम, त्या वर्षात, देखभालीकरिता आणि दुस-या परंतुकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे सुविधा पुरविण्याकरिता व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याकरिता खर्च केली असल्यास त्याला त्या रकमेची, ज्या वर्षात ती जादा रक्कम खर्च करण्यात आली असेल, त्या वर्षाच्या लगत नंतरच्या पुढील चार वर्षांमध्ये गोळा करण्यात यावयाच्या सेवा आकाराच्या रकमेतून वजावट करता येईल : ]

[४][ परंतु तसेच, फिरत्या चित्रपटगृहाच्या मालकाने सेवा आकार म्हणून प्रत्येक तिकिटामागे पन्नास पैशांहून अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, स्वतंत्रपणे आकारलेली असेल आणि अशा फिरत्या चित्रपटगृहाचा मालक, अशा सेवा आकाराची रक्कम मुंबई चित्रपटगृहे (विनियमन) अधिनियम, १९५३ व महाराष्ट्र चित्रपटगृहे (विनियमन) नियम, १९६६ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही अन्य कायदा यांच्या तरतुदींअन्वये आवश्यक असलेल्या सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजनांव्यतिरिक्त (याबाबतीत काढण्यांत आलेल्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे) राज्य शासनाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, फिरत्या चित्रपटागृहाची देखभाल व सुविधा व सुरक्षिततेच्या उपाययोजना पुरविण्याकरिता परवाना कालावधीमध्ये खर्च केली असल्याची (या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे), विहित अधिका-याची खात्री पटेल अशा प्रकारे दाखवून देईल तर, अशा फिरत्या चित्रपटगृहाचा मालक, त्याने सेवा आकारापोटी गोळा केलेली व

---

[१]सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ब) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.
[२]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २(ङ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २(च) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[४]सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २(ख) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

खर्च केलेली रक्कम, त्याने अशा फिरत्या चित्रपटगृहाच्या देखभालीकरिता व त्यासाठी अतिरिक्त विनिर्दिष्ट सुविधा पुरविण्याकरिता व सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याकरिता परवाना कालावधीत खर्च केलेली रक्कम असल्यासंबंधीचे लेखापरीक्षित लेखे परवाना संपुष्टात आल्यापासून एका महिन्याच्या कालावधीमध्ये विहित अधिका-याकडे सादर करील. या शर्तीस अधीन राहून, सेवा आकारापोटी दिलेल्या अशा रकमेचा, प्रवेश मिळविण्यासाठी दिलेल्या रकमेमध्ये समावेश केला जाणार नाही.]

[१][ (ख-१) ] " पूल गेम " म्हणजे, पूल टेबलावर किंवा बिलियर्डच्या टेबलावर किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या किंवा कोणत्याही प्रकारे वर्णन केल्या जाणा-या टेबलावर क्यू म्हणून संबोधण्यात येणारी मोठी काठी, क्यू चेंडू आणि नेमून दिलेल्या संख्येइतके ऑब्जेक्ट चेंडू यांच्या सहाय्याने खेळला जाणारा खेळ. क्यू चेंडू वापरणारा प्रत्येक खेळाडू कोणत्याही क्रमाने किंवा कोणत्याही संगतीने किंवा कोणत्याही रीतीने किंवा पद्धतीने ऑब्जेक्ट चेंडू जाळीत ढकलील.

(ख-२) " पूल पार्लर " म्हणजे ज्यासाठी व्यक्तींनी कोणत्याही पद्धतीने किंवा रीतीने रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे असा पूल गेम खेळण्यासाठी एक किंवा अधिक टेबलांची तरतूद असते असे करमणुकीचे ठिकाण.]

[२][ (ग) करमणुकीच्या संबंधात, " मालक " या संज्ञेत पुढील कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो :—

(एक) करमणुकीच्या व्यवस्थेस जबाबदार असणारी व्यक्ती, किंवा

(दोन) कोणत्याही मुदतीसाठी, करमणुकीच्या आयोजनाशी कोणत्याही रीतीने संबंधित असणारी व्यक्ती, किंवा

(तीन) करमणुकीसाठी प्रवेश देण्याच्या कामाचा प्रभार असणारी किंवा ते काम तिच्याकडे सोपवण्यात आलेली किंवा असा अधिकार देण्यात आलेली व्यक्ती, किंवा

(चार) करमणुकीच्या व्यवस्थेस जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्या व्यवस्थेचा प्रभार असणारी व्यक्ती– मग, तिने त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली अशा करमणुकीच्या जागेकरिता कोणतेही लायसन्स असल्यास, ते मिळवलेले असो किंवा नसो;]

[३][ (पाच) कोणत्याही प्रकारचा अँटेना किंवा केबल दूरचित्रवाणी यापासून केबल कनेक्शन देण्याची व्यवस्था करण्यास जबाबदार असणारी किंवा त्या त्या वेळी त्या व्यवस्थेची प्रभारी असणारी व्यक्ती;]

[४][ (सहा) पूल-पार्लरच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्या त्या वेळी त्या व्यवस्थापनाचा प्रभार असणारी व्यक्ती;] [५][* * *]

[६][ (सात) बोलिंग-ॲलीची व्यवस्था पाहण्यास जबाबदार असणारी किंवा त्या त्यावेळी व्यवस्थेची प्रभारी असणारी व्यक्ती.] [७][* * * *]

---

[१]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २(एक) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[२]सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(क) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आले.

[३]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(पाच) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[४]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २(२)(ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[५]सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २(एक)(अ) अन्वये " किंवा " हा शब्द वगळण्यात आला.

[६]सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २(एक)(तीन) अन्वये हा मजकूर १ एप्रिल, २००० पासून जादा दाखल करण्यात आला.

[७]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २(ख)(एक) अन्वये " किंवा " हा शब्द वगळण्यात आला.

[१][ (आठ) कोणत्याही नृत्य-बारच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्याची प्रभारी असणारी, किंवा पाश्चात्य देशांमधील लोकनृत्यासह पाश्चात्य देशांमधील पाश्चात्य संगीत (शास्त्रीय, सुगम किंवा वाद्य) व नृत्य यांचे किंवा **रास-गरबा, दांडिया, डिस्को दांडिया** किंवा **पर्जन्य-दांडिया (रेन-दांडिया)** किंवा कोणत्याही नावाने ओळखल्या जाणा-या **रास-गरबा** किंवा **दांडिया** याप्रकारच्या भारतीय लोकनृत्याचे कार्यक्रम आयोजित करण्यास जबाबदार असणारी कोणतीही व्यक्ती;] [२][* * *]

[३][ (नऊ) कोणत्याही बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्याची प्रभारी असणारी कोणतीही व्यक्ती, भागीदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली कपंनी; ] [४][ किंवा ] १९५६ चा १.

[५][ (दहा) किंवा कोणत्याही गो-कार्टींग (Go-carting) केंद्राच्या व्यवस्थापनास जबाबदार असणारी किंवा त्यावेळी त्याची प्रभारी असणारी एखादी भागिदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली कंपनी ; १९५६ चा १.

(अकरा) किंवा व्हिडिओ सुविधा असणा-या प्रवासी बसची मालकी असणारी एखादी भागिदारी संस्था, निगम निकाय किंवा कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली कंपनी ; १९५६ चा १.

(बारा) किंवा भारतीय तार अधिनियम, १८८५ आणि भारतीय बिनतारी संदेश व्यवस्था अधिनियम, १९३३ अन्वये भारत सरकारकडून, थेट घरपोच प्रसारण सेवा (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) पुरवण्याचे लायसन असणारी अशी कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये नोंदणी झालेली एखादी कंपनी. ; ] १८८५ चा १३. १९३३ चा १७. १९५६ चा १.

(घ) "करमणुकीच्या स्थानात प्रवेश देणे" या शब्दप्रयोगात करमणुकीचा कार्यक्रम होत असलेल्या कोणत्याही स्थानात [६][किंवा केबल नेटवर्कला जोडलेल्या अशा कोणत्याही प्रकारच्या अँटेनापासून किंवा केबल दूरचित्रवाणीपासून [७][किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेपासून (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) ] दिलेल्या केबल कनेक्शनांद्वारे जेथून करमणुकीची तरतूद केली जाते अशा कोणत्याही स्थानात प्रवेश देण्याचा समावेश होतो;]

[८][(घ-१) "जिल्हाधिकारी" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याच्या कलम ७ अन्वये जिल्ह्याकरिता नियुक्त केलेला जिल्हाधिकारी, असा आहे, १९६६ चा महा. ४१.

(घ-२) "आयुक्त" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६, याच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला विभागाचा आयुक्त असा आहे; ] १९६६ चा महा. ४१.

[९][(ङ) "मानार्थ तिकिट" म्हणजे पैसे न घेता दिलेले किंवा अशा प्रवेशासाठी द्यावयाच्या दरापेक्षा कमी दराने पैसे घेऊन दिलेले तिकिट किंवा प्रवेश-पत्रिका; ]

---

[१]सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २(एक)(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम (बी)(दोन) अन्वये " किंवा " हा शब्द वगळण्यात आला.
[३]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ख)(एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[४]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ग)(दोन) अन्वये " किंवा " हा शब्द समाविष्ट करण्यात आला.
[५]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ग)(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[६]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (घ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[८]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ कलम २ (अ) अन्वये खंड (घ-१) व (घ-२) हे समाविष्ट करण्यात आले.
[९]सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम २ अन्वये मूळ खंडा ऐवजी खंड (ङ) दाखल करण्यात आले.

[१][(ड-ड) "नृत्य बार " याचा अर्थ, जेथे मद्य पुरविण्याबरोबरच मनोरंजनासाठी कोणत्याही प्रकारच्या संगीताच्या तालावर कोणत्याही प्रकारच्या नृत्याचे कार्यक्रम देखील आयोजित केले जातात, असा कोणताही बार किंवा परमिट-रूम, असा आहे आणि त्यात या सर्वांचा समावेश होतो; ]

[२][(ड-ड-१) "थेट घरपोच प्रसारण सेवा (Direct-to-Home (DTH) Broadcasting service) " याचा अर्थ, केबल चालक या सारख्या मध्यस्थांमार्फत न जाता वर्गणीदाराच्या जागेत थेट दूरचित्रवाणी संकेत पोहोचवण्याची व्यवस्था करून सॅटेलाईट पद्धतीच्या वापराद्वारे के यू बँडमधील बहुविध वाहिन्यांचे दूरचित्रवाणी कार्यक्रम वितरित करण्याची पद्धत, असा आहे ;

**स्पष्टीकरण**.—हा खंड आणि खंड (ग-१अ) याच्या प्रयोजनार्थ, "के यू बँड (Ku Band) " याचा सामान्यपणे अर्थ, ११.७-१२.७ जीएचझेड (गिगा हर्टझ्) फ्रिक्वेन्सी बँड, ज्याचे दोन खंडात विभाजन होते, ते असे, पहिला ११.७-१२.२ गिगा हर्टझ् फ्रिक्वेन्सी असलेला बँड ह्रा एफएसएस (फिक्सड् सॅटेलाईट सर्विस) म्हणून ओळखला जातो आणि दुसरा १२-२-१२.७ गिगा हर्टझ् फ्रिक्वेन्सी असलेला बिएसएस (ब्रॉडकास्टींग सॅटेलाईट सर्विस) म्हणून ओळखला जातो किंवा वेळोवेळी, भारत सरकारद्वारा मान्य केले जातील असे इतर बँडविड्थ त्यामध्ये असू शकतात ;]

[३][(च) कोणत्याही करमणुकीच्या संबंधात " करमणूक शुल्क " किंवा " शुल्क " म्हणजे कलम ३ [४][* *]अन्वये बसविण्यात आलेले करमणुक शुल्क ;

[५][(च) (क) " बहुविध चित्रपटगृह संकुल (मल्टिप्लेक्स थिएटर कॉम्प्लेक्स) " याचा अर्थ, ज्यात,—

(एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील संकुलामध्ये एकूण किमान १,२५० इतक्या आसनक्षमतेसह चार चित्रपटगृहांपेक्षा कमी नसतील एवढी चित्रपटगृहे ; आणि

(दोन) राज्यात अन्यत्र कोठेही, संकुलामध्ये एकूण किमान १,००० इतक्या आसनक्षमतेसह तीन चित्रपटगृहांपेक्षा कमी नसतील एवढी चित्रपटगृहे.

आणि शासनाने याबाबतीत, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इतर आनुषंगिक व तत्संबंधित बाबी आणि सुविधा, आणि बहुविध करमणूक कार्यक्रम आणि इतर सुविधा पुरविल्या जातात, असे करमणूक-नि-सांस्कृतिक केंद्र, असा आहे ;]

[६][(च-१) " स्थायी सिनेमा " किंवा " स्थायीवत सिनेमा " याचा अर्थ, यथास्थिति, महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) नियम, १९६६ अन्वये ज्यांना स्थायी सिनेमा किंवा स्थायीवत सिनेमा म्हणून लायसन मिळाले आहे, असा सिनेमा ;]

---

[१]सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ कलम २(२) अन्वये खंड (ड-ड) हा समाविष्ट करण्यात आला.
[२]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ड-ड-१) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.
[३]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ कलम २(ब) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (च) दाखल करण्यात आला.
[४]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० कलम २ (७) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[५]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २(ग) अन्वये खंड (च-क) समाविष्ट करण्यात आला.
[६]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ (क) अन्वये खंड (च-१) समाविष्ट करण्यात आला.

[१][(छ) करमणुकीचे स्थान यामध्ये, पुढील बाबींचा समावेश होईल :—

(एक) करमणुकीच्या स्थानात केलेली कोणतीही वाढ ;

(दोन) ज्या घरामध्ये, इमारतीमध्ये, तंबूमध्ये किंवा इतर कोणत्याही जागेत करमणूक विषयक [२][किंवा कोणत्याही प्रकारचा अँटेना किंवा केबल दूरचित्रवाणी यापासून केबल जोडणी देण्याच्या व्यवस्थेविषयक] [३][किंवा थेट घरपोच प्रसारण सेवेची तरतूद करणा-या व्यवस्थेविषयक (डीटीएच)] लेखा-पुस्तके, तिकिट पुस्तके किंवा इतर कोणतेही संबंधित अभिलेख ठेवण्यात आले असतील किंवा ठेवले असल्याचे मानण्यात येत असेल असे घर, इमारत, तंबू किंवा इतर कोणतीही जागा ;

[४][(छ-१) (क) सेट टॉप बॉक्स याचा अर्थ, थेट सॅटेलाईट वरून डिश ॲन्टेनामार्फत अमूर्त स्वरूपातील दूरचित्रवाणी संकेत गोळा करून ते मूर्त स्वरूपात दूरचित्रवाणी संचाकडे प्रसारित करणारा निवासी किंवा अनिवासी जागेतील दूरचित्रवाणी संचाला जोडलेला उपकरण संच, असा आहे. ज्यामुळे, मालकाने कोणत्याही रीतीने गोळा केलेले शुल्क जोडणीधारकाने प्रदान केल्यावर प्रेक्षकांना के यू बँडमधील बहुविध वाहिन्यांचे दूरचित्रवाणी कार्यक्रम लावून पाहणे शक्य होते ;]

[५][(छ-१) विहित म्हणजे या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित ;

(छ-२) अधिभार म्हणजे [६][कलम ३ अअ अन्वये बसविण्यात आलेला असा, चलचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफद्वारे) करण्यात येणा-या तसेच व्हिडिओद्वारे करण्यात येणा-या प्रदर्शनाव्यतिरिक्त केबल नेटवर्कला जोडलेल्या अशा कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाद्वारे किंवा केबल दूरचित्रवाणीद्वारे केल्या जाणा-या प्रदर्शनासह] कोणत्याही करमणुकीवरील अधिभार ;]

[७][(छ-३) पुरस्कर्त्याची रक्कम याचा अर्थ, करमणूक कार्यक्रमाच्या आयोजकाला पुरस्कर्त्याचे उत्पादन किंवा त्याचे ब्रँड नाव इत्यादीच्या जाहिरातीच्या बदल्यात पुरस्कर्त्याकडून देण्यात आलेली रक्कम [८][अथवा पुरविलेल्या मालाचे किंवा दिलेल्या सेवांचे किंवा उपलब्ध करून दिलेल्या लाभांचे मूल्य] असा आहे.

(ज) ' तिकिट ' किंवा मुदती तिकिट याचा अर्थ, करमणूकीच्या स्थानाच्या मालकाने एखाद्या व्यक्तीला किंवा अनेक व्यक्तींना करमणुकीच्या कार्यक्रमाला प्रवेश देण्याकरिता म्हणून दिलेले तिकिट ;

(झ) " फिरता सिनेमा " म्हणजे, चलचित्रपट प्रदर्शित करण्यासाठी किंवा स्थानिक चित्रपटगृहात किंवा सभागृहात -[९][मग अशा चित्रपटगृहांवर छप्पर असो अथवा ती खुली असोत] चलचित्रपट दाखवण्यासाठी चलचित्रकाचे उपकरण, संयंत्र व तंबू (एन्क्लोजर) या सर्वांचा समावेश असलेली एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेली जाणारी साधनसामग्री ;

---

[१]सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(ड) अन्वये खंड (छ), (ज), (झ), (ञ) व (ट) हे जादा दाखल करण्यात आले.

[२]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(८) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(च) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४]हा खंड वरील अधिनियमाच्या कलम २ (छ) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[५]सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २(ब) अन्वये खंड (छ-१) व (छ-२) अन्वये हे समाविष्ट करण्यात आले.

[६]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(९) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (ज) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[८]सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४ कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(१०) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

१९५३ चा मुंबई ११. (ञ) " व्हिडिओद्वारे चित्रपट प्रदर्शन "म्हणजे, मुंबई सिनेमा (विनियमन) अधिनियम, १९५३ आणि त्याखाली केलेले नियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याअन्वये, लायसन्स दिलेले किंवा लायसन्स न दिलेले हॉटेल किंवा सार्वजनिक वाहन यांव्यतिरिक्त, इतर निवासी किंवा निवासेतर अशा करमणुकीच्या जागेत [१][ कोणत्याही प्रकारच्या ॲंटेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या ] साह्याने दाखवण्यात येत असेल ते खेरीजकरुन, एकतर दूरचित्रवाणी संचाच्या पडद्यावर किंवा व्हिडिओस्कोपवर किंवा अन्यथा व्हिडिओ कॅसेट प्लेअर किंवा रेकॉर्डरच्या साह्याने, [२][आधी ध्वनिचित्रित केलेली कॅसेट, व्हिडिओ कॅसेट प्लेअर किंवा रेकॉर्डर किंवा व्हिडिओ डिस्क प्लेअर किंवा रेकॉर्डर किंवा कोणत्याही तत्सम उपकरणाच्या सहाय्याने आधी ध्वनिचित्रित केलेली कॅसेट किंवा डिस्क किंवा दोन्ही] दाखवून किंवा पुन्हा दाखवून, त्याद्वारे आर्थिक फायद्यासाठी, चलचित्रपट किंवा हलती चित्रे किंवा चित्रपटमालिका दाखविणे;

(ट) " व्हिडिओ खेळघर " म्हणजे इलेक्ट्रॉनिक्सच्या सहाय्याने किंवा यंत्राच्या सहाय्याने जे चालविण्यात येते असे यंत्र चालविण्याकरिता व्यक्तींना जेथे पैसे द्यावे लागतात असे करमणुकीचे स्थान.

करमणुकीच्या स्थानात प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या पैशावर शुल्क.

३. [३][ (१) [४][ व्हिडिओ खेळ आणि कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या सहाय्याने केले जाणारे प्रदर्शन किंवा थेट घरपोच प्रसारण सेवा (डीटीएच) यांच्या सहाय्याने केले जाणारे प्रदर्शन, बोलींग-ॲली, गो-कार्टींग, नृत्य बार, डिस्कोथेक, मनोरंजन पार्क, जलक्रीडा कार्यक्रम, पूलगेम [५][ किंवा व्हिडिओ सुविधेसह पर्यटक बस ] यांव्यतिरिक्त,- ] कोणत्याही करमणुकीच्या स्थानात प्रवेश मिळण्यासाठी द्यावयाच्या सर्व पैशांवर पुढील दराने शुल्क (ज्याचा यात यापुढे " करमणूक शुल्क " असा निर्देश करण्यात आला आहे) बसविण्यात आणि राज्य शासनाकडे भरण्यात येईल :-

१९१२ चा मुंबई ३. (अ) द्यावयाची रक्कम ही, [६][* * * * *] मुंबईच्या शर्यतीच्या मैदानाबाबत लायसन्स देण्यासंबंधी अधिनियम, १९१२ [७][ किंवा महाराष्ट्र कुत्र्यांच्या शर्यतींच्या जागांसाठी लायसन्स देण्याबाबत अधिनियम,
१९७६ चा महा. ३३. १९७६ ] अन्वये लायसन्स दिलेल्या शर्यतीच्या मैदानात प्रवेश मिळविण्यासाठी देण्यात आली असेल त्याबाबतीत, अशा रकमेच्या शेकडा [८][ १०० ] टक्के दराने, आणि -

[९][ (ब) व्हिडिओ प्रदर्शन, व्हिडिओ खेळ, कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाद्वारे केलेले प्रदर्शन, केबल दूरचित्रवाणी (टेलिव्हिजन) द्वारे, थेट घरपोच प्रसारण सेवेद्वारे केलेले प्रदर्शन, बोलिंग ॲली, गो-कार्टींग, नृत्यबार, डिस्कोथेक, मनोरंजन उद्यान, जलक्रीडा कार्यक्रम, पूलगेम किंवा व्हिडिओ सुविधेसह पर्यटक बस

---

[१]हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम २(११) ब अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[२]हा मजकूर " व्हिडिओ प्लेअर किंवा रेकॉर्डरच्या सहाय्याने आधी ध्वनिचित्रित केलेली कॅसेट " या ऐवजी वरील अधिनियमाच्या कलम २(११)(अ) अन्वये दाखल करण्यात आला.

[३]सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५३, कलम २ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४]सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३(अ)(एक) अन्वये मूळ मजकुराएवेजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५]सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३(क)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६]सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २(एक) अन्वये शुल्काची रक्कम वगळून हा मजकूर वगळण्यात आला.

[७]सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ११, अनुसूची अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८]सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० कलम ३(एक)(ब) अन्वये हा आकडा " ५० " या आकड्याऐवजी दाखल करण्यात आला.

[९]हा मजकूर "आणि व्हिडओ खेळ" या ऐवजी सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ (एक) (सी) अन्वये दाखल करण्यात आला.

यांसह चलचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफ) केलेले प्रदर्शन खेरीज करून, पुढील हद्दीतील प्रत्येक करमणुकीच्या बाबतीत,-

**तक्ता**

| अनुक्रमांक (१) | क्षेत्र (२) | तिकिटाच्या मूल्यापैकी देय असलेली करमणूक शुल्काची रक्कम (३) |
|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | २५ टक्के |
| २ | सर्व महानगरपालिका (बृहन्मुंबई महानगरपालिकेव्यतिरिक्त) आणि सर्व कटक क्षेत्रें. | २० टक्के |
| ३ | " अ " वर्ग, " ब " वर्ग आणि " क " वर्ग नगरपरिषदा | १५ टक्के |
| ४ | उपरोक्त नोंदी १ ते ३ मध्ये समाविष्ट नसलेली | शुल्क नाही] |

(१) कोणतीही अन्य क्षेत्रे.

(एक) (क) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील;

(ख) नागपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील;

(ग) अमरावती, औरंगाबाद, [१][ कल्याण-डोंबिवली, ] कोल्हापूर, नाशिक, पिंपरी-चिंचवड, पुणे, सोलापूर, [२][ ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, [३][ नांदेड-वाघाळा आणि सांगली-मिरज व कुपवाड ]] या प्रत्येक शहराच्या महानगरपालिकेच्या हद्दीतील;

(घ) भिवंडी [४][ नगरपरिषदांच्यां ] नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीतील,

(ङ) पुणे, सोलापूर, देहू रोड, देवळाली, कामठी व खडकी आणि छावण्यांच्या हद्दीतील [५][ आणि ]

[६][ * * * * * * ]

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३(अ)(एक)(एक) अन्वये " कल्याण " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २(एक)(अ)(एक) अन्वये हा मजकूर " आणि ठाणे " दाखल करण्यात आला.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३(अ)(एक)(दोन) अन्वये " आणि नांदेड " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ (एक) (अ)(एक)(दोन) अन्वये " आणि उल्हासनगर नगर परिषद " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(एक)(अ)(एक)(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २(एक)(अ)(एक)(चार) अन्वये (फ) हा मजकूर वगळण्यात आला.

१९४९ चा मुंबई ५९. (च) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये ज्या शहराकरिता नगरपालिका स्थापन करण्यात आली असेल अशा इतर कोणत्याही क्षेत्राच्या हद्दीतील प्रत्येक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या बाबतीत-

(१) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांवर - अशा रकमेच्या [१][ २४ टक्के. ]

(२) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या त्यापुढील १०० पैशांवर - अशा रकमेच्या [२][ ३९ टक्के. ]

(३) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेतील उर्वरित रकमेवर - अशा रकमेच्या [३][ ३९ टक्के. ]

(दोन) अकोला, धुळे, मालेगांव, [४,५][ * * * ] ही नगरे किंवा शहरे आणि उप-खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेले शहरे व नगरे खेरीज करुन एक लाख पन्नास हजार आणि त्याहून अधिक लोकसंख्या असलेली इतर कोणतीही शहरे किंवा नगरे यांच्या हद्दीतील प्रत्येक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या बाबतीत—

(१) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांवर - अशा रकमेच्या [६][ २१ टक्के. ]

(२) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या त्यापुढील १०० पैशांवर - अशा रकमेच्या [७][ ३० टक्के. ]

(३) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेतील उर्वरित रकमेवर - अशा रकमेच्या [८][ ३९ टक्के. ]

(तीन) पंचवीस हजारांहून अधिक, परंतु एक लाख पन्नास हजारांहून कमी लोकसंख्या असणा-या शहरांच्या किंवा नगरांच्या हद्दीतील प्रत्येक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या बाबतीत—

(१) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांवर - अशा रकमेच्या [९][ २० टक्के. ]

(२) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेच्या त्यापुढील १०० पैशांवर - अशा रकमेच्या [१०][ २९ टक्के. ]

(३) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेतील उर्वरित रकमेवर - अशा रकमेच्या [११][ ३६ टक्के. ]

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम २(एक)(ए)(एक)(पाच)(अ) अन्वये " ४० टक्के " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २(एक)(ए)(एक)(पाच) (ब) अन्वये " ५५ टक्के " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(एक)(ए)(एक) पाच (क) अन्वये " ६५ टक्के " या मजकूरऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[४] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ खंड (एक) (अ) उपखंड (दोन) (एक) अन्वये " नांदेड " हा शब्द वगळण्यात आला.

[५] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३ (१)(अ) (२) अन्वये " सांगली " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ (एक) (अ) (दोन) (दोन) अन्वये " ३५ टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक) (अ) उपखंड (दोन) (तीन) अन्वये " ५० टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक) (अ) उपखंड (दोन) (चार) अन्वये " ६५ टक्के " या आकडे व मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक) (अ) उपखंड (तीन) (एक) अन्वये " ३३ टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम २ (एक) (अ) उपखंड (तीन) (दोन) अन्वये " ४८ टक्के " या आकडे व मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] वरील अधिनियमाच्या कलम २ (एक) (अ) उपखंड (तीन) (तीन) अन्वये " ६० टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(चार) इतर कोणत्याही क्षेत्रातील प्रत्येक करमणुकीच्या कार्यक्रमाच्या बाबतीत—

(१) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांवर - अशा रकमेच्या [१][ १८ टक्के. ]

(२) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या त्यापुढील १०० पैशांवर - अशा रकमेच्या [२][ २४ टक्के. ]

(३) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेतील उर्वरित रकमेवर - अशा रकमेच्या [३][ ३० टक्के. ]

करमणूक शुल्क बसवण्यात येईल :

[४][परंतु, कॅब्रे [५][ * * * ] या करमणुकीच्या बाबतीत, मालकाने प्रत्येक खेळासाठी, मग तो खेळ खाद्यपदार्थ किंवा पेये यासह किंवा याशिवाय असो आणि त्यासाठी नियमित तिकिटे देण्यात येत असोत किंवा नसोत, प्रत्येक व्यक्तीमागे अशा करमणुकीसाठी प्रवेश मिळण्यासाठी आकारलेल्या एकूण रकमेच्या पन्नास टक्के रक्कम ही, प्रवेश दिलेली रक्कम असल्याचे मानण्यात येईल व त्याप्रमाणे त्यावर या खंडान्वये शुल्क आकारण्यात येईल :

परंतु आणखी असे की, मनोरंजन उद्यानाच्याबाबतीत, करमणूक शुल्क हे , खेळ व सवा-या यांसाठी प्रवेश मिळण्याकरिता देण्यात येणा-या रकमेसह, मग अशी रक्कम वेगळी आकारण्यात येत असो किंवा नसो, मनोरंजन उद्यानात प्रवेश मिळण्यासाठी देण्यात येणा-या रकमेच्या १५ टक्के इतके असेल :

[६][परंतु तसेच, कोणत्याही नावाने संबोधण्यात येणा-या जल क्रीडाविषयक उपक्रमाच्या बाबतीत आकारावयाचे करमणूक शुल्क,– मग तो उपक्रम मनोरंजन उद्यानात असो किंवा त्याच्या बाहेर असो.–जल क्रीडाविषयक उपक्रमासाठी दिलेल्या प्रवेशाकरिता भरण्यात आलेल्या रकमेच्या १० टक्के इतके असेल व त्यामध्ये, पाण्यातील खेळ किंवा क्रीडांकरिता दिलेल्या प्रवेशाबद्दल भरण्यात आलेल्या रकमेचाही - मग ती स्वतंत्ररीत्या आकारली असो किंवा नसो–समावेश असेल.]

**स्पष्टीकरण**.—उपखंड (दोन) व (तीन) च्या प्रयोजनासाठी, " लोकसंख्या " म्हणजे, ज्या जनगणनेचे तात्पुरते किंवा अंतिम आकडे प्रसिद्ध झाले आहेत अशा निकटपूर्वीच्या जनगणनेत निश्चित केलेली लोकसंख्या.]

[७][(ग) कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या सहाय्याने केले जाणारे प्रदर्शन खेरीज करून, व्हिडिओद्वारे प्रदर्शन धरून चलचित्रकाद्वारे पुढील हद्दीत करण्यात येणा-या प्रदर्शनाच्या बाबतीत,—

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक)(अ) उपखंड (चार)(एक) अन्वये " ३० टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक)(अ) उपखंड (चार)(दोन) अन्वये " ४० टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २ खंड (एक)(अ) उपखंड (चार)(तीन) अन्वये " ५० टक्के " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ३ (एक) अन्वये मूळ परंतुकाऐवजी ही परंतुके दाखल करण्यात आली.

[५] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ (क) (दोन) अन्वये "किंवा डिस्कोथेक " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ (अ) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (क) (तीन) अन्वये खंड (क) दाखल करण्यात आले.

[१][ तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | मालकाने निश्चित केलेल्या प्रवेश आकारावरील करमणूक शुल्काचा दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील | ४५ टक्के |
| २. | इतर सर्व महानगरपालिका आणि कटक क्षेत्रांच्या हद्दीतील | ४० टक्के |
| ३. | " अ " वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील | ३४ टक्के |
| ४. | " ब " वर्ग नगरपरिषदांचा हद्दीतील | २८ टक्के |
| ५. | " क " वर्ग नगरपरिषदांचा हद्दीतील | २२ टक्के |
| ६. | उपरोक्त नोंदी १ ते ५ मध्ये समाविष्ट नसलेली कोणतीही इतर क्षेत्रे. | १५ टक्के] |

[२][(१-क) कलम २ चे खंड (क) व (ख) यात किंवा या अधिनियमातील, प्रवेश मिळण्यासाठी देण्यात येणा-या रकमेसंबंधीच्या इतर कोणत्याही तरतुदीत काहीही अंतर्भूत असले तरी, व्हिडिओ खेळाच्या बाबतीत, [३][पुढे दिलेल्या तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी] करमणूक शुल्क बसवण्यात येईल व ते राज्य शासनाकडे देण्यात येईल :—

[४][तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | व्हिडिओ खेळ यंत्राचा प्रकार | करमणूक शुल्काचा प्रतियंत्र प्रति महिना दर (रुपयांत) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील | (१) एका व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | १,००० |
| | | (२) एकाच वेळी दोन व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | २,००० |
| २. | बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर सर्व महानगरपालिकांच्या हद्दीतील. | (१) एका व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | ७५० |
| | | (२) एकाच वेळी दोन व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | १,५०० |
| ३. | वरील नोंद १ आणि २ मध्ये अंतर्भूत नसलेल्या इतर सर्व क्षेत्राच्या हद्दीतील. | (१) एका व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | ५०० |
| | | (२) एकाच वेळी दोन व्यक्तीकडून चालविले जाणारे यंत्र. | १,०००] |

[१] सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

[२] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४(ब) अन्वये पोटकलम १(क) ला नवीन पोटकलम १(कक) असा क्रमांक देण्यात आला आणि पोटकलम १(कक) पूर्वी पोटकलम १(क) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ख)(एक) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख)(दोन) अन्वये खंड (अ) व (ब) ऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

[1][१ (कक) या अधिनियमान्वये द्यावयाच्या शुल्कचा व अधिभाराचा हिशेब करताना, ऐक रुपराचा ५ पैशांपेक्षा कमी असलेला अपूर्णांक किंवा जो ५ पैशांच्या पटींमध्ये नाही असा अपूर्णांक प्रकरणपरत्वे, ५ पैसे म्हणून किंवा ५ पैशांच्या पुढील पटींमध्ये रूपांतरित करण्यात येईल.]

(२) एखाद्या करमणुकीच्या स्थानात प्रवेश मिळण्यासाठी दिलेली रक्कम ही कोणत्याही संस्थेस वर्गणी किंवा अंशदान म्हणून ठोक रकमेच्या स्वरुपात दिली असेल किंवा मुदती तिकिटासाठी किंवा विशिष्ट मुदतीतील करमणूक मालिकेत किंवा कोणत्याही करणुकीत प्रवेश मिळण्याच्या अधिकारासाठी रोख रकमेच्या रुपाने दिली असेल किंवा आणखी पैसे न देता किंवा कमी केलेल्या दराने पैसे भरून प्रवेश मिळण्याचा अधिकार ज्याबरोबर प्राप्त होतो किंवा अशा प्रवेशाचा अधिकार ज्यात अंतर्भूत असेल असा कोणताही विशेषाधिकार, अधिकार, सवलत किंवा गोष्ट मिळविण्यासाठी ठोक रकमेच्या रुपाने दिली असेल त्याबाबतीत करमणूक शुल्क, [2][पोट-कलम (एक) च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी, अशा ठोक रकमेच्या ५० टक्क्यांवर बसविण्यात येईल व दिले जाईल.]

[3][(३)(क) खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणि उक्त तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रामध्ये असलेल्या करमणुकीच्या ठिकाणी तसेच व्हिडिओद्वारे प्रदर्शनासह [4][परंतु कोणत्याही प्रकारच्या अँटेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या सहाय्याने करण्यात येणारे प्रदर्शन वगळून,] प्रकरणामध्ये पोट-कलम (१) याच्या खंड (ग) अन्वये कर भरण्याऐवजी, अशा प्रदर्शनाच्या मालकाला विहित करण्यात येतील अशा शर्तीच्या अधीन राहून, पुढील स्तंभ (३) मधील त्या त्या प्रकरणासमोरील नोंदी मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक आठवड्याला, राज्य शासनाकडे शुल्काची रक्कम भरता येईल :—

[5][**तक्ता**

| अनुक्रमांक (१) | क्षेत्र (२) | शुल्काची रक्कम (३) |
|---|---|---|
| एक (अ) | सर्व महानगरपालिका, पुणे, सोलापूर, देहू रोड, देवळाली, कामठी आणि खडकी कटक क्षेत्रे यांच्या क्षेत्रांच्या हद्दीतील. | एका खेळाच्या स्थूल उत्पन्नाच्या क्षमतेच्या ३० टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवण्यात आलेल्या खेळांच्या ७२ टक्के खेळांनी गुणून येणारी रक्कम. |
| (ब) | एक लाख पन्नास हजार इतक्या आणि त्यापेक्षा अधिक लोकसंख्येची शहरे व नगरे यांच्या क्षेत्रांच्या हद्दीतील. | एका खेळाच्या स्थूल उत्पन्नाच्या क्षमतेच्या ३० टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवण्यात आलेल्या खेळांच्या ६८ टक्के खेळांनी गुणून येणारी रक्कम. |
| दोन | पंचवीस हजारांपेक्षा अधिक परंतु एक लाख पन्नास हजारांपेक्षा कमी लोकसंख्येची शहरे व नगरे यांच्या क्षेत्रांच्या हद्दीतील. | एका खेळाच्या स्थूल उत्पन्नाच्या क्षमतेच्या २० टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवण्यात आलेल्या खेळांच्या ७२ टक्के खेळांनी गुणून येणारी रक्कम. |
| तीन | पंचवीस हजारापर्यंत आणि त्यापेक्षा कमी लोकसंख्येची इतर कोणतीही क्षेत्रे. | एका खेळाच्या स्थूल उत्पन्नाच्या क्षमतेच्या १५ टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवण्यात आलेल्या खेळांच्या ६० टक्के खेळांनी गुणून येणारी रक्कम.] |

[1] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ३(ब) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोटकलम १(कक) दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३(ग) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ३ (ड) अन्वये पोटकलम ३(क) जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ (२)(अ)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ खंड (ग) उपखंड (एक)(ख) अन्वये हा तक्ता दाखल करण्यात आला.

**स्पष्टीकरणः**— या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, [१][ व्हिडिओ प्रदर्शन ] च्या संबंधातील " स्थूल उत्पन्नाची क्षमता " म्हणजे " महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) नियम, १९६६ " अन्वये लायसन प्राधिका-याने दिलेल्या लायसनमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे [२][ व्हिडिओ सिनेमा ] गृहात प्रेक्षकांकरिता उपलब्ध असलेली व पुरवलेली सर्व आसने (सीट्स) आणि इतर जागा पेक्षकांनी व्यापली तर, पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये करपात्र असलेले शुल्क धरून, त्या एका खेळाकरिता प्रवेशादाखल मिळेल एवढे एकूण अंदाजित उत्पन्न-

[३][ (क-क) खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर, चलचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफद्वारे) करण्यात येणा-या प्रदर्शनाच्या प्रकरणात, परंतु कोणत्याही प्रकारचे व्हिडिओ प्रदर्शन व ॲन्टेनाच्या किंवा केबल दूरचित्रवाणीच्या सहाय्याने करण्यात येणारे प्रदर्शन खेरीजकरून, पोट-कलम (१) याच्या, खंड (क) अन्वये कर भरण्याऐवजी, अशा प्रदर्शनाच्या मालकाला, शुल्काची रक्कम, विहित करण्यात येतील अशा शर्तींना अधीन राहून, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मधील त्या त्या नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रत्येक आठवड्याला, राज्य शासनाकडे भरता येईल.

**तक्ता**

| अनुक्रमांक | क्षेत्र | करमणूक शुल्काची रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | " अ " वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील | एका खेळाच्या हाऊसफुल कर क्षमतेच्या ३० टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवलेल्या खेळांच्या संख्येने गुणून येणारी रक्कम. |
| २ | " ब " वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील | एका खेळाच्या हाऊसफुल कर क्षमतेच्या २४ टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवलेल्या खेळांच्या संख्येने गुणून येणारी रक्कम. |
| ३ | " क " वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीतील | एका खेळाच्या हाऊसफुल कर क्षमतेच्या १८ टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवलेल्या खेळांच्या संख्येने गुणून येणारी रक्कम. |
| ४ | वरील नोंदी १ ते ३ मध्ये समाविष्ट नसलेली, सर्व महानगरपालिका आणि कटक क्षेत्रे वगळून इतर सर्व क्षेत्रे. | एका खेळाच्या हाऊसफुल कर क्षमतेच्या १२ टक्के रकमेला प्रत्यक्ष दाखवलेल्या खेळांच्या संख्येने गुणून येणारी रक्कम. |

[१] वरील अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) (एक) उपखंड (ग) (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात येईल.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) (एक) उपखंड (ग) (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ खंड (ग) (दोन) अन्वये हा खंड व तक्ता समाविष्ट करण्यात आला.

**स्पष्टीकरण**:— या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, चलचित्रकाद्वारे करण्यात येणा-या प्रदर्शनाच्या बाबतीत, " खेळाची हाऊसफुल कर क्षमता " म्हणजे, महाराष्ट्र सिनेमा (विनियमन) नियम, १९६६ अन्वये लायसन प्राधिका-याने दिलेल्या लायसनमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रेक्षकांकरिता उपलब्ध असलेली व पुरवलेली सर्व आसने (सीट्स) आणि इतर जागा प्रेक्षकांनी व्यापल्या तर, पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये देय असलेल्या शुल्काची काल्पनिक एकूण बेरीज.]

[१][ (ख) या पोट-कलमान्वये बसविण्यायोग्य असलेले शुल्क हे, मालकाने दर आठवड्याला दाखविलेल्या खेळाची प्रत्यक्ष संख्या विचारात घेऊन, खंड (क) [२][ किंवा यथास्थिति, खंड (क-क) ] च्या तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार, त्याच्याकडून दर आठवड्याला वसुलीयोग्य असेल.]

[३][ स्पष्टीकरण :— या खंडाच्या प्रयोजनांसाठी, मालकाने आठवड्यात भरवलेल्या खेळांच्या प्रत्यक्ष संख्येत, त्याने त्या आठवड्यात भरवलेल्या करमुक्त चित्रपटांच्या खेळांचा समावेश होणार नाही.] (ग) या पोट-कलमान्वये शुल्क भरण्यास तयार असेल असा कोणताही मालक या पोट-कलमाअन्वये शुल्क भरण्याच्या परवानगीकरिता, विहित अधिका-याकडे विहित नमुन्यात अर्ज करील. (घ) [४][ व्हिडिओ सिनेमाची स्थूल उत्पन्नाची क्षमता किंवा सिनेमागृहाची हाऊसफुल कर क्षमता ] निश्चित करण्यात आल्यानंतर आसनांच्या संख्येत किंवा जागेमध्ये किंवा सोयींमध्ये किंवा अशा प्रदर्शनाला प्रवेश मिळविण्याकरिता भरावयाच्या दरात मालकाने विहित अधिका-याकडे तशी पंधरा दिवसांची नोटीस दिली नसेल तोपर्यंत बदल किंवा फेरबदल करण्यात येणार नाही. आणि, स्थूल उत्पन्नाची क्षमता [५][ किंवा यथास्थिति, सिनेमागृहाची हाऊसफुल कर क्षमता ] पुनर्निर्धारित करण्यात येईपर्यंत, त्यास पूर्वी निश्चित केलेले शुल्कच भरावे लागेल.

(ङ) हे पोट-कलम ज्यास लागू आहे असा कोणताही [६][ व्हिडिओ सिनेमाचा किंवा यथास्थिति, सिनेमागृहाचा ] मालक अशा प्रदर्शनाच्या स्थूल उत्पन्न क्षमतेची [७][ किंवा यथास्थिति, हाऊसफुल कर क्षमतेची ] परिगणना करताना जमेस धरलेल्या प्रवेश शुल्कापेक्षा कोणतीही अधिक रक्कम शुल्काच्या रूपाने किंवा अन्यथा वसूल करू शकणार नाही किंवा वसूल करवून घेणार नाही.

(च) या पोट-कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जेव्हा चलचित्रकाद्वारे प्रदर्शित केलेल्या चित्रपटाला (सिनेमॅटोग्राफ फिल्म) कलम ६ अन्वये शुल्क भरण्यापासून सूट देण्यात येते किंवा त्यात कपात करण्यात येते, तेव्हा प्रत्येक प्रवेशाच्या संबंधात भरावयाचे प्रवेश शुल्काचे दर अशा प्रदानाच्या संबंधात, सूट दिलेल्या किंवा कपात केलेल्या शुल्काच्या मर्यादेपर्यंत कमी करण्यात येतील. मालक भरावयाच्या प्रवेश शुल्काच्या दरात कपात करीत नसेल तर, तो या अधिनियमाखालील अन्य कोणत्याही शास्तीच्या जोडीला जणू काही कलम ६ अन्वये त्यास शुल्क भरण्यापासून सूट दिलेली नाही किंवा कपात केलेली नाही असे समजून शुल्क भरण्यास पात्र राहील.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ (२) (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ख) दाखल करण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ग) (तीन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ३ (२) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[४] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ग) (चार) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) (चार) (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) (पाच) (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) (पाच) (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(छ) खंड (फ) अन्वये प्रवेशाकरिता भरावयाच्या दरातील सूट परिगणित करताना शुल्कात अशी सूट देण्याच्या प्रयोजनाकरिता जमेस धरावयाची स्थूल उत्पन्नाची क्षमता [1][ किंवा यथास्थिति, हाऊसफुल कर क्षमता ] या पोट-कलमाच्या खंड (क) [2][ किंवा यथास्थिति, खंड (क-क) ] च्या स्पष्टीकरणामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणेच असेल.

(ज) या पोट-कलमान्वये दिलेल्या विकल्पाचा वापर कॅलेंडर वर्षामध्ये एकदाच करता येईल आणि त्याच कॅलेंडर वर्षामध्ये तो मागे घेण्याची परवानगी मालकाला असणार नाही.

(झ) ज्याने या पोट-कलमाखालील शुल्क दिलेली नाही अशा [3][ व्हिडिओद्वारे प्रदर्शन किंवा यथास्थिति, चलचित्रकाद्वारे प्रदर्शन (सिनेमॅटोग्राफ एक्झिबिशन) ] करणा-या मालकाला, या पोट-कलमाखालील शुल्क देण्यासाठी राज्य शासनाने, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या रकमेइतकी रक्कम विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने तारण दिल्याखेरीज असे [3][ व्हिडिओद्वारे प्रदर्शन किंवा यथास्थिति, चलचित्रकाद्वारे प्रदर्शन ] चालविता येणार नाही.

(ञ) या पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, [4][ खंड (क) किंवा यथास्थिति, खंड (क-क) खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ] प्रदर्शनाच्या ठिकाणी अखंडपणे संपूर्ण आठवडाभर खेळ भरविण्यात आला नसेल त्याबाबतीत, आयुक्त, त्याला आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, ज्या आठवड्यात खेळ भरविण्यात आला नाही त्या आठवड्यासाठी संबंधीत खेळाच्या प्रदर्शनाचा संबंध असेल तेथवर या पोट-कलमाखाली देय असलेले शुल्क माफ करील.

[5][[6][ (४) पोट-कलम (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाच्या किंवा अन्य साधनाच्या मदतीने केबल नेटवर्कमार्फत किंवा केबल दूरचित्रवाणीमार्फत प्रसारणा मिळविण्याकरिता चित्रपट किंवा हलती चित्रे किंवा चित्रमालिका दाखविण्यासाठी, ज्यात रेडिओ वारंवारता संकेत (फ्रिक्वेन्सी सिग्नल्स) मिळतात अशा प्रत्येक दूरदर्शन संचावर, खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसवण्यात येईल व मालकाकडून ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

[7][तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रति दूरदर्शन संचावरील प्रति महिना भरावयाची करमणूक शुल्काची (रुपये) रक्कम |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | सर्व महानगरपालिका आणि सर्व कटक क्षेत्रे यांच्या हद्दीमध्ये. | ४५ |
| २. | सर्व "अ" आणि "ब" वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीमध्ये | ३० |
| ३. | वरील नोंदी १ आणि २ यामध्ये समाविष्ट न होणा-या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीमध्ये | १५] |

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ग) (सहा) (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील मजकुराच्या कलम ३ (ग) (सहा) (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) (सात) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ग) (आठ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ (३) अन्वये पोटकलम (४) व (५) जादा दाखल करण्यात आली.

[6] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ (ब) अन्वये पोटकलम (४) दाखल करण्यात आले.

[7] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

(५)(क) पोट-कलम (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु खंड (ब) च्या तरतुदींना अधीन राहून, २५ डिसेंबर, १९८९ रोजी व त्या दिनांकापासून मनोरंजन उद्यानाच्या बाबतीत मालकाकडून पुढील रीतीने करमणूक शुल्क बसवण्यात येईल व राज्य शासनाकडे भरण्यात येईल:—

(एक) मनोरंजन उद्यानाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून पहिल्या तीन वर्षांसाठी कोणतेही शुल्क नाही ;

(दोन) नंतरच्या दोन वर्षांसाठी, पोट-कलम (१) चा खंड (ब) किंवा यथास्थिति, कलम ३ चे पोट-कलम (२) या अन्वये बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काच्या दराच्या पन्नास टक्के दराने ;

(तीन) सहाव्या वर्षापासून, पोट-कलम (१) चा खंड (ब) किंवा यथास्थिति, कलम ३ चे पोट-कलम (२) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने बसविण्यायोग्य असलेल्या करमणूक शुल्कांची संपूर्ण रक्कम.

**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) मनोरंजन उद्यान ज्या दिनांकास जनतेला प्रवेशासाठी खुले करण्यात येईल तो दिनांक हा, मनोरंजन उद्यानाच्या प्रारंभाचा दिनांक असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) मनोरंजन उद्यानाच्या व्यवस्थापनातील बदल किंवा मनोरंजन उद्यानातील खेळ किंवा सवा-या यात झालेल्या बदलाचा अर्थ मनोरंजन उद्यानाचा नव्याने प्रारंभ असा लावण्यात येणार नाही.

(ब) मनोरंजन उद्यानाच्या मालकाला, मनोरंजन उद्यान ज्या ठिकाणी सुरू करण्यात आले त्याच ठिकाणी आणि सतत दहा वर्षापर्यंत चालू राहीले तर, आणि तरच, खंड (अ) अन्वये शुल्कातील सवलत देण्यात येईल आणि ते अशा प्रकारे चालू ठेवण्यात आले नाही तर पोट-कलम (१) चा खंड (ब) किंवा यथास्थिति, कलम ३ चे पोट-कलम (२) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी मनोरंजन उद्यानाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून शुल्क आकारण्यात येईल व मालक ते भरण्यास पात्र ठरेल.]

[1][(५-क) (क) पोट-कलम (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु खंड (ब) च्या तरतुदीस अधीन राहून, मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, १९९८ हा अंमलात येण्याच्या दिनांकापासून कोणत्याही जलक्रीडा उपक्रमाच्या संदर्भात पुढीलप्रमाणे करमणूक शुल्क आकारण्यात येईल व मालकाकडून राज्य शासनाकडे ते भरण्यात येईल,—

(एक) जलक्रीडा उपक्रम सुरू होण्याच्या दिनांकापासून पहिली तीन वर्षे-कोणतेही शुल्क नाही.

(दोन) नंतरच्या दोन वर्षासाठी-कलम ३ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ब) किंवा यथास्थिति, पोट-कलम (२) अन्वये आकारण्यायोग्य शुल्क दराच्या ५० टक्के.

(तीन) सहाव्या वर्षापासून कलम ३, मधील पोट-कलम (१), खंड (ब) किंवा यथास्थिति, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने आकारण्यायोग्य करमणूक शुल्काची पूर्ण रक्कम.

**स्पष्टीकरण**.— या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी.—

(एक) ज्या दिनांकास जलक्रीडा उपक्रम जनतेला प्रवेश देण्यासाठी खुला केला असेल तो दिनांक जलक्रीडा उपक्रम सुरू झाल्याचा दिनांक समजण्यात येईल.

(दोन) जलक्रीडा उपक्रमाच्या व्यवस्थापनात झालेला बदल किंवा जलक्रीडा उपक्रमात झालेला बदल याचा अर्थ जलक्रीडा उपक्रमाचा नव्याने प्रारंभ असा लावण्यात येणार नाही ;

(ख) जलक्रीडा उपक्रमाच्या मालकाला, जलक्रीडा उपक्रम ज्या ठिकाणी सुरू करण्यात आला त्याच ठिकाणी आणि सतत दहा वर्षापर्यंत चालू राहिला तर आणि तरच, खंड (अ) अन्वये शुल्कातील सवलत देण्यात येईल आणि तो अशा प्रकारे चालू ठेवण्यात आला नाही तर, कलम ३ मधील पोट-कलम (१) चा खंड (ख) किंवा यथास्थिति, पोट-कलम (२) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी जलक्रीडा उपक्रमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून शुल्क आकारण्यात येईल व मालक ते भरण्यास पात्र ठरेल.]

---

१. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३(क) अन्वये हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[१][(६) पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये, किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, १६ सप्टेंबर, १९९४ पासून प्रारंभ होणा-या आणि [२][३१ डिसेंबर, १९९६] रोजी संपणा-या [३][दोन वर्ष साडेतीन महिन्यांच्या] कालावधीसाठी, व्हिडिओद्वारे केले जाणारे प्रदर्शन, व्हिडिओ खेळ आणि कोणत्याही प्रकारच्या ॲन्टेनाद्वारे किंवा केबल दूरचित्रवाणीद्वारे करण्यात येणारे प्रदर्शन यांसह चलचित्रकाद्वारे करण्यात येणा-या प्रदर्शनाव्यतिरिक्त इतर प्रत्येक करमणुकीच्या बाबतीत पुढीलप्रमाणे करमणूक शुल्क बसविण्यात येईल आणि मालकाकडून राज्य शासनास देण्यात येईल,—

| | | |
|---|---|---|
| (एक) | सर्व महानगरपालिका, " अ " आणि " ब " वर्गाच्या सर्व नगरपरिषदा, आणि सर्व कटक क्षेत्रांच्या हद्दीमध्ये,— | |
| | (अ) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या २० टक्के. |
| | (ब) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या त्या पुढील १०० पैशांपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या ३० टक्के. |
| | (क) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेच्या उर्वरित रकमेपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या ३५ टक्के. |
| (दोन) | इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीमध्ये,— | |
| | (अ) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या पहिल्या १०० पैशांपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या २० टक्के. |
| | (ब) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेच्या त्यापुढील १०० पैशांपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या २५ टक्के. |
| | (क) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या एकूण रकमेच्या उर्वरित रकमेपैकी. | अशा दिलेल्या रकमेच्या ३५ टक्के. |

(७) पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, १६ सप्टेंबर, १९९४ रोजी सुरू होणा-या व [४][३१ डिसेंबर, १९९६] रोजी संपणा-या [५][दोन वर्ष साडेतीन महिन्यांच्या] कालावधीसाठी, कोणत्याही प्रकारचा ॲन्टेना किंवा केबल दूरचित्रवाणी यांच्या सहाय्याने करण्यात येणा-या प्रदर्शनाव्यतिरिक्त व्हिडिओद्वारे केल्या जाणा-या प्रदर्शनासह चलचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफ) करण्यात येणा-या प्रदर्शनाच्या संबंधात खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, करमणूक शुल्क बसविण्यात येईल व मालकाकडून राज्य शासनास देण्यात येईल :—

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ३ (३) अन्वये पोटकलम (६), (७) व (८) दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, कलम २ (अ) (दोन) अन्वये "१५ सप्टेंबर, १९९६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अध्यादेशाच्या कलम २ (अ) (एक) अन्वये "दोन वर्षे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा अध्यादेश क्रमांक १४, कलम २ (ब) (दोन) अन्वये "१५ सप्टेंबर, १९९६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अध्यादेशाच्या कलम २ (ब) (एक) अन्वये "दोन वर्षे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**तक्ता**

| क्षेत्र (१) | | | प्रवेश मिळण्यासाठी द्यावयाच्या मालकाने निश्चित केलेल्या रकमेवरील करमणूक शुल्काचा दर (२) | |
|---|---|---|---|---|
| नोंद (क) ते (घ) दोन्ही धरून यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी— | | | | |
| एक. | (क) | सर्व महानगरपालिकांच्या हद्दीतील; | (एक) एक रुपयापर्यंत | प्रवेश मिळण्यासाठी द्यावयाच्या रकमेच्या ४० टक्के. |
| | (ख) | भिवंडी व उल्हासनगर या नगरपरिषदांच्या हद्दीतील; | | |
| | (ग) | पुणे, सोलापूर, देहू रोड, देवळाली, कामठी आणि खडकी या कटकाच्या हद्दीमधील. | (दोन) १ रुपयापेक्षा अधिक परंतु २ रुपयांपेक्षा अधिक नाही, आणि | अशा द्यावयाच्या रकमेच्या ४५ टक्के. |
| | (घ) | एक लाख पन्नास हजार आणि त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेले, वर उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त इतर कोणतेही शहर किंवा नगर. | (तीन) दोन रुपयांपेक्षा अधिक | अशा द्यावयाच्या रकमेच्या ५० टक्के. |
| दोन. | | पंचवीस हजारापेक्षा अधिक परंतु एक लाख पन्नास हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या, उपखंड (एक) मध्ये उल्लेखिलेल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही शहरांच्या किंवा नगरांच्या हद्दीमधील. | (एक) १ रुपयापर्यंत | अशा द्यावयाच्या रकमेच्या ३५ टक्के. |
| | | | (दोन) १ रुपयापेक्षा अधिक परंतु २ रुपयांपेक्षा अधिक नाही, आणि. | अशा द्यावयाच्या रकमेच्या ४० टक्के. |
| | | | (तीन) दोन रुपयांपेक्षा अधिक. | अशा द्यावयाच्या रकमेच्या ४५ टक्के. |
| तीन. | | पंचवीस हजारापर्यंत आणि त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीमधील. | (एक) एक रुपयापर्यंत. | अशा द्यावयाच्या रकमेच्या ३० टक्के. |
| | | | (दोन) १ रुपयापेक्षा अधिक परंतु २ रुपयांपेक्षा अधिक नाही, आणि | अशा द्यावयाच्या रकमेच्या ३५ टक्के. |
| | | | (तीन) दोन रुपयांपेक्षा अधिक. | अशा द्यावयाच्या रकमेच्या ४० टक्के. |

(८) पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी १६ सप्टेंबर, १९९४ रोजी सुरु होणा-या व [१][ ३१ डिसेंबर १९९६ ] रोजी संपणा-या [२][ दोन वर्ष साडेतीन महिन्यांच्या ] कालावधीसाठी, खालील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व उक्त तक्त्याच्या स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रात असलेल्या करमणुकीच्या ठिकाणी व्हिडिओद्वारे करावयाच्या प्रदर्शनासह परंतु कोणत्याही प्रकारचा ॲन्टेना किंवा केबल दूरचित्रवाणी यांच्या सहाय्याने केले जाणारे प्रदर्शन वगळून, चलचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफद्वारे) केल्या जाणा-या प्रदर्शनाच्या बाबतीत, पोट-कलम (३) च्या खंड (क) अन्वये देय असलेल्या कराच्या ऐवजी, अशा प्रदर्शनाचा मालक, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीन राहून, तक्त्याच्या स्तंभ (३) मधील संबंधित नोंदीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली शुल्काची रक्कम प्रत्येक आठवड्याला राज्य शासनाला देऊ शकेल.

**तक्ता**

| | क्षेत्र | सिनेमाचा किंवा प्रदर्शनाचा प्रकार | शुल्काची रक्कम |
|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) |
| एक. (अ) | सर्व महानगरपालिका, भिवंडी व उल्हासनगर या नगरपरिषदा, पुणे, सोलापूर, देहूरोड, कामठी आणि खडकी ही कटक क्षेत्रे यांच्या हद्दींमधील. | व्हिडिओद्वारे प्रदर्शन | एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ९० टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या २० टक्के. |
| (ब) | एक लाख पन्नास हजार व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेली शहरे आणि नगरे यांच्या हद्दींमधील. | स्थायी स्वरुपाचे, स्थायीवत स्वरुपाचे व वर छप्पर असलेले फिरते सिनेमे व व्हिडिओद्वारे प्रदर्शने. छप्पर नसलेले खुले फिरते सिनेमे. | एका खेळाच्या एकूण उत्पन्न-क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ८५ टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळां-पैकी ७५ टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या २० टक्के. |
| दोन. | पंचवीस हजारांपेक्षा अधिक परंतु एक लाख पंन्नास हजारापेक्षा कमी लोकसंख्या असलेली शहरे आणि नगरे यांच्या हद्दीमधील. | स्थायी स्वरुपाचे, स्थायीवत स्वरुपाचे व वर छप्पर असलेले फिरते सिनेमे व व्हिडिओद्वारे प्रदर्शने. | एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ८० टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या १५ टक्के. |

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, कलम २ (क) (दोन) अन्वये "१५ सप्टेंबर, १९९६" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अध्यादेशाच्या कलम २ (क) (एक) अन्वये "दोन वर्षे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

तक्ता.—पुढे चालू.

| (१) | | (२) | (३) |
|---|---|---|---|
| | | छप्पर नसलेले खुले फिरते सिनेमे | एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ६५ टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या १५ टक्के. |
| (तीन) | पंचवीस हजारापर्यंत आणि त्यापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीमधील. | स्थायी स्वरुपाचे, स्थायीवत स्वरुपाचे व वर छप्पर असलेले फिरते सिनेमे व व्हिडिओद्वारे प्रदर्शने. | एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ७५ टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या १० टक्के. |
| | | छप्पर नसलेले खुले फिरते सिनेमे. | एका खेळाच्या एकूण उत्पन्न क्षमतेला प्रत्यक्षात दाखवण्यात आलेल्या खेळांपैकी ६० टक्के खेळांनी गुणले असता येणा-या रकमेच्या १० टक्के.] |

[१][ (९) पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा पूल-पार्लर्सच्या बाबतीत खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसविण्यात येईल व पूल-पार्लर्सच्या मालकाकडून ते प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत राज्य शासनाकडे आगाऊ भरण्यात येईल.

तक्ता

| अनुक्रमांक<br>(१) | क्षेत्र<br>(२) | पूल-गेमच्या प्रत्येक टेबलासाठी दरमहा आगाऊ द्यावयाची करमणूक शुल्काची रक्कम<br>(३)<br>(रुपये) |
|---|---|---|
| १. | बृहन्मुंबई, नवी मुंबई व ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत. | ५,००० |
| २. | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत | ३,००० |
| ३. | नोंद (१), (२) मध्ये समाविष्ट न केलेल्या इतर महानगरपालिकांच्या हद्दीत. | २,००० |
| ४. | नोंद (१), (२) व (३) मध्ये समाविष्ट न केलेल्या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीत. | १,००० ] |

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ३ (ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले आहे.

[१][ (१०) पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक बोलींग-ॲलीच्या मालकावर अशा बोलींग-ॲलीमध्ये खेळाकरिता मर्यादित मार्गाच्या संबंधात, [२][ खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने,] करमणूक शुल्क बसविण्यात येईल आणि अशा बोलींग-ॲलीच्या मालकाकडून, ते प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत राज्य शासनाकडे आगाऊ भरण्यात येईल.]

[२][तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रत्येक मार्गासाठी करमणूक शुल्काची मासिक रक्कम (रूपयांमध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत. | ५,००० |
| २. | नोंद (१) मध्ये समावेश न होणारे इतर सर्व क्षेत्र. | ३,००० ] |

[३][ (११) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशा नृत्य-बार मधील प्रत्येक कार्यक्रमाच्या बाबतीत खालील तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसविण्यात येईल व प्रत्येक नृत्यबारच्या मालकाकडून ते प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत राज्य शासनाकडे आगाऊ भरण्यात येईल :—

[४][तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | नृत्य-बारमधील प्रत्येक कार्यक्रमासाठी करमणूक शुल्काची मासिक रक्कम (रूपयांमध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत. | ३०,००० |
| २. | बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून इतर सर्व महानगरपालिकांच्या हद्दीत. | २५,००० |
| ३. | वरील नोंद (१) आणि (२) मध्ये ज्यांचा समावेश होत नाही अशी इतर सर्व क्षेत्रे. | १५,००० |

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ (ब) (दोन) अन्वये हे पोट-कलम दि. १ एप्रिल, २००० पासून जादा दाखल करण्यात आले.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (ड) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये पोट-कलमे (११) व (१२) जादा दाखल करण्यात आली.

[४] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ (च) अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

(१२) या अधिनियमाच्या पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(एक) पाश्चात्य संगीत (शास्त्रीय, सुगम किंवा वाद्य) ;

(दोन) पाश्चात्य देशातील लोकनृत्यासह पाश्चात्य नृत्ये ; आणि

(तीन) रास-गरबा, दांडिया, डिस्को-दांडिया किंवा पर्जन्य-दांडिया (रेन दांडिया) किंवा कोणत्याही नावाने ओळखली जाणारा रास-गरबा किंवा दांडिया यांसारखी भारतीय लोकनृत्ये ;

[१][ * * * ] अशा कार्यक्रमांच्या किंवा प्रयोगांच्या बाबतीत, पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क बसविण्यात येईल व ते मालकाकडून राज्य शासनाकडे भरण्यात येईल.]

[२][(१३) (क) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु, खंड (ख) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती यांना अधीन राहून, मुंबई करणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २००१ अंमलात आल्याच्या दिनांकापासून राज्य शासन बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या बाबतीत पुढीलप्रमाणे शुल्क बसवील व त्या संकुलाच्या मालकाकडून ते वसूल करील :— २००२ चा महा. ११.

(एक) बहुविध चित्रपटगृह संकुल प्रारंभ होण्याच्या दिनांकापासून पहिल्या तीन वर्षांकरिता कोणतेही शुल्क नाही ;

(दोन) नंतरच्या दोन वर्षांसाठी, पोट-कलम (१) च्या खंड (ब) आणि खंड (क) किंवा, यथास्थिती, पोट-कलम (३) या अन्वये बसविण्यायोग्य असलेल्या शुल्काच्या दराच्या पंचवीस टक्के दराने ;

(तीन) सहाव्या वर्षापासून, पोट-कलम (१) च्या खंड (ब) आणि खंड (क) किंवा, यथास्थिती, पोट-कलम (३) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने बसविण्यायोग्य असलेल्या करमणूक शुल्काची पूर्ण रक्कम. परंतु, जेथे लागू असेल तेथे, बसविण्यायोग्य शुल्क पोट-कलम (२) च्या तरतुदींना देखील अधीन असेल.

**स्पष्टीकरण**— या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता,—

(घ) अस्तित्वात असलेल्या चित्रपटगृहाची मूळ आसनक्षमता कमी न करता आणि कलम २ च्या खंड (क-अ) मधील तरतुदींचे अनुपालन करुन त्याचे बहुविध चित्रपटगृह संकुलात रूपांतर केल्यास, असे रूपांतरित चित्रपटगृह देखील, खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तींना अधीन राहून, खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, शुल्कातील सवलतीस हक्कदार असेल.]

(एक) बहुविध चित्रपटगृह संकुल ज्या दिनांकास जनतेला प्रवेश देण्यासाठी खुले करण्यात येईल तो दिनांक, बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या प्रारंभाचा दिनांक असल्याचे मानण्यात येईल ;

(दोन) बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या व्यवस्थापनातील बदल, किंवा संकुलाच्या नावातील बदल याचा अर्थ, बहुविध चित्रपटगृह संकुलाचा नव्याने प्रारंभ, असा लावण्यात येणार नाही.

(ख) खंड (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शुल्कातील सवलत ही, पुढील अटी व शर्तींना अधीन राहून, बहुविध चित्रपटगृह संकुलाच्या मालकाला उपलब्ध असेल :—

[३]["(एक) वरील खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या सवलतीच्या कालावधीत, बहुविध चित्रपटगृह संकुलातील किमान प्रवेश दर जिल्हाधिकारी निर्धारित करील. असा किमान प्रवेश दर हा, ज्या जिल्ह्यात बहुविध चित्रपटगृह संकुल असेल त्या जिल्ह्यातील कोणत्याही चित्रपटगृहाच्या सर्वाधिक दरांच्या पन्नास आसनांचा दर वगळून, प्रचलित सर्वाधिक दरापेक्षा कमी असणार नाही आणि त्यानुसार हे किमान प्रवेश दर सकाळच्या, मॅटिनीच्या आणि इतर वेळेच्या खेळांसाठी निरनिराळे असू शकतील ; "]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४, कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) संकुलातील एक चित्रपटगृह, प्रत्येक वर्षातील एका महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या एकूण कालावधीसाठी, केवळ मराठी चित्रपटांकरिता राखून ठेवण्यात येईल.

(तीन) संकुलाचा मालक, खंड (ब) खालील सवलतीचा कालावधी संपेपर्यंत, सेवा आकार बसविणार नाही. सवलतीचा कालावधी संपल्यानंतर मालकाला कलम २ च्या खंड (ख) च्या दुस-या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सेवा आकार बसविता येईल.

(चार) बहुविध चित्रपटगृह संकुल सलग १० वर्षे अखंडितपणे चालू राहील.

(पाच) कलम २ च्या खंड (च-क) अन्वये काढलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, संकुलामध्ये पुरविलेल्या कोणत्याही सुविधा, राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय खंडित करता येणार नाही किंवा कपात करता येणार नाही. (ग) खंड (ख) मधील, शर्त (चार) किंवा (पाच) चा भंग केल्यास, सवलत काढून घेतली जाण्यास पात्र असेल आणि पोट-कलम (१) चे खंड (ख) आणि (ग) किंवा, यथास्थिती, पोट-कलम (३) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने बहुविध चित्रपटगृह संकुलांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून शुल्क, त्याचबरोबर कलम ९-ब मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने आकारण्यायोग्य असलेले व्याज बसविण्यात येईल व वसूल करण्यात येईल.

[१][(१४) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक गो-कार्टींग केंद्राच्या मालकाकडून दरमहा प्रत्येक कारला रुपये २,००० या दराने प्रत्येक कारच्या बाबतीत आगाऊ करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि ते प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

(१५) पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये किंवा पोट-कलम (४) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक थेट-घरपोच प्रसारण सेवेच्या (डीटीएच) मालकाकडून प्रति दूरचित्रवाणी संचावर, जो थेट-घरपोच प्रसारण सेवेमार्फत (डीटीएच) प्रक्षेपण करण्यासाठी त्याला जोडलेल्या सेट-टॉप बॉक्सच्या किंवा कोणत्याही इतर उपकरणाच्या सहाय्याने चित्रपट किंवा चलचित्रे किंवा चित्रमालिका यांच्या प्रदर्शनासाठी रेडिओ फ्रिक्वेन्सी सिग्नल स्वीकारतो त्यावर, पुढील तक्त्यात त्या त्या क्षेत्रासाठी विनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आकारण्यात येईल आणि प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत ते राज्य शासनाकडे भरण्यात येईल.

[२]["तक्ता

| अनुक्रमांक | क्षेत्र | प्रति दूरचित्रवाणी संचावरील प्रति महिना भरावयाची, करमणूक शुल्काची रक्कम (रूपये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | सर्व महानगरपालिका आणि सर्व कटक क्षेत्रे यांच्या हद्दीमध्ये. | ४५ |
| २. | सर्व अ आणि ब वर्ग नगरपरिषदाच्या हद्दीमध्ये. सर्व महानगरपालिकांच्या हद्दीत. | ३० |
| ३. | वरील नोंद (१) आणि (२) यामध्ये समाविष्ट न होणा-या इतर कोणत्याही क्षेत्रांच्या हद्दीमध्ये. | १५ ".] |

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ (ग) अन्वये ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

[२] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ कलम २ (ख) अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

(१६) पोट-कलम (१) च्या खंड (ख) मध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, व्हिडिओ सुविधा असलेल्या प्रत्येक पर्यटन बसच्या मालकाकडून, प्रत्येक कॅलेंडर वर्षातील जानेवारी महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत अशा बसच्या बाबतीत, प्रत्येक बसवर प्रतिवर्षी रु. १,००० या दराने करमणूक शुल्क आकारण्यात येईल व ते राज्य शासनाला आगाऊ देण्यात येईल.

(१७) पोट-कलम (१) चा खंड (ख) किंवा पोट-कलम (२) यामध्ये किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यातील प्रत्येक डिस्कोथेकच्या मालकाकडून, प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या दहा तारखेपर्यंत अशा डिस्कोथेकच्या बाबतीत, पुढील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दराने आणि प्रवर्गानुसार करमणूक शुल्क आकारण्यात येईल व ते राज्य शासनाला आगाऊ देण्यात येईल.

[१][“तक्ता

| अनुक्रमांक | प्रवर्ग | प्रति महिना आगाऊ भरावयाची करमणूक शुल्काची रक्कम (रुपयांमध्ये) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील— | |
| | (क) पंचतारांकित हॉटेलातील डिस्कोथेक. | २,००,००० |
| | (ख) पंचतारांकित हॉटेलात असलेल्या डिस्कोथेक व्यतिरिक्त इतर जागांमधील डिस्कोथेक. | १,००,००० |
| २. | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीबाहेरील— | |
| | (क) पंचतारांकित हॉटेलातील डिस्कोथेक. | १,००,००० |
| | (ख) पंचतारांकित हॉटेलात असलेल्या डिस्कोथेक व्यतिरिक्त इतर जागांमधील डिस्कोथेक | ५०,०००] |

[५][प्रवेशासाठी दिलेल्या रकमेवरील किंवा ठोक शुल्कावरील] अधिभार.

† [२][३. कक. [३][(१)(क) कलम ३, पोट-कलम (१) अन्वये,—

[४][कलम ३ च्या पोट-कलम (५) च्या खंड (ख) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे दहा वर्षे चालू नाही असे मनोरंजन उद्यान नसेल अशा मनोरंजन उद्यान] व्यतिरिक्त [६][ * * * ] चलतचित्रकाद्वारे (सिनेमॅटोग्राफद्वारे) तसेच [५][व्हिडिओद्वारे आणि केबल नेटवर्कद्वारे किंवा केबल दूरचित्रवाणीद्वारे] [७][ * * * ] [८][थेट-घरपोच

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ खंड (ग) उपखंड (च) अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

[२] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ कलम ३ अन्वये कलम ३ कक हे समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ४(अ) अन्वये मूळ कलमाऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (एक) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (दोन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

† सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याचे कलम १० पुढीलप्रमाणे आहे :—

फिरती सिनेमागृहे, व्हिडिओ प्रदर्शने आणि व्हिडिओ खेळ व त्यांच्यापासून मिळालेले उत्पन्न इत्यादी यांच्या संबंधात पूर्वलक्षी प्रभावाने शुल्क बसवणे.

“ १०. (१) या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेली कलमे ३ व ३-अअ यामधील तरतुदींस हानी न पोचवता, १ जानेवारी, १९८४ या दिनांकास व त्या दिनांकापासून फिरती सिनेमागृहे, व्हिडिओ प्रदर्शने आणि व्हिडिओ खेळ यांच्या बाबतीतील करमणूक शुल्क आणि अधिभार हा, जणू काही या सुधारणा व विशेष तरतुदी, अशा सुधारणांचा व तरतुदींचा जेथवर मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, १९८३ याद्वारे यथास्थिती, फिरती सिनेमागृहे, व्हिडिओ प्रदर्शने किंवा व्हिडिओ खेळ यांच्या संबंधात एकत्रित किंवा ठोक रकमेच्या स्वरुपात बसवलेल्या शुल्काशी आणि त्या संबंधात दिलेल्या आगाऊ रकमेशी संबंध येतो तेथवर, अधिनियमित करण्यात आलेले नाहीत असे समजून, पुढील दराने बसवण्यायोग्य असेल आणि कायदेशीर रीतीने बसवण्यायोग्य असल्याचे मानण्यात येईल :— १९८३ चा महा. अध्या. २२.

प्रसारण सेवेद्वारे (डीटीएच)] [1][आणि डिस्कोथेक], [2][डिस्कोथेक, प्रदर्शने, संगीत व नृत्याचे कार्यक्रम आणि फॅशन शोज] करण्यात येणा-या कोणत्याही प्रदर्शनाव्यतिरिक्त प्रत्येक करमणुकीकरिता प्रवेश मिळण्यासाठी द्यावयाच्या सर्व रकमांवर जेव्हा प्रवेशाचा दर एक रुपयापेक्षा अधिक नसेल तेव्हा ५ टक्के दराने अधिभार आकारण्यात येईल आणि इतर सर्व बाबतीत ह्या अधिभाराचा दर १० टक्के असेल.

[3][ * * * * * * ]

(ब) कलम ३, पोट-कलम (अ) अन्वये, शुल्काच्या ठोक रकमेवर, १० टक्के दराने अधिभार आकारण्यात येईल.

[4] [ * * * * ]

[5] [ * * * * ].

[6][(३) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या अधिभाराचे उत्पन्न, प्रथमतः राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल व या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन, राज्य शासनाकडून निश्चित करण्यात येईल असा अधिभार गोळा करणे व वसूल करणे या संबंधातील खर्च वजा केल्यानंतर, याबाबतीत कायद्यान्वये रीतसर १९५८ चा विनियोजन केल्यानंतर, मुंबई मोटार वाहन (उतारूंवर कर आकारणे) अधिनियम, १९५८ याच्या कलम ५-अ मुंबई ६७. मध्ये निर्देशित केलेल्या आरोग्य व पोषण निधीकडे नोंद करून हस्तांतरित करण्यात येईल व त्या कलमाच्या तरतुदींच्या अधीन, त्यामध्ये नमूद केलेल्या रीतीने व प्रयोजनासाठी खर्च करण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये आरोग्य व पोषण निधीकडे हस्तांतरित केलेली रक्कम राज्याच्या एकत्रित निधीवर भारित करण्यात येईल.]

[7][**३ क.** दिनांक १ एप्रिल, १९५१ पासून मालकाने दिलेल्या प्रत्येक मानार्थ तिकिटावर कलम ३ अन्वये विहित केलेल्या समुचित दराने असे तिकिट धारण करणा-या व्यक्तींस ज्या वर्गाच्या आसनावर किंवा जागेवर बसण्याचा किंवा तिचा उपयोग करण्याचा हक्क असेल त्या वर्गात किंवा जागेत प्रवेश मिळण्यासाठी त्या वर्गाच्या किंवा जागेच्या दराप्रमाणे जणू पूर्ण रक्कम भरून प्रवेश मिळविण्यात आला आहे, असे समजून करमणूक शुल्क [8][आणि कलम ३ अअ द्वारे तरतूद करण्यात आलेला अधिभार] वसूल करण्यात येईल ; आणि या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता असे तिकिट धारण करणा-या व्यक्तीकडून पैसे घेऊन तिला प्रवेश देण्यात आला असे समजण्यात येईल.] मानार्थ तिकिटावर शुल्क.

(अ) फिरते सिनेमागृह आणि व्हिडिओ प्रदर्शन यांच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (१) खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या त्याच दराने करमणूक शुल्क आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३-अअ, पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने अधिभार;

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ (३) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४ (चार) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन् १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ४ (ब) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[4] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ (ब) अन्वये हा खंड वगळण्यात आला.

[5] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ४ (ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[6] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ (ड) अन्वये " मनोरंजन शुल्क " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७७, कलम २ अन्वये पोट-कलमे (३) व (४) जादा समाविष्ट करण्यात आले.

[8] सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ३ अन्वये कलम ३ क दाखल करण्यात आले.

(ब) व्हिडिओ खेळाच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३, पोट-कलम (१-अ) मध्ये दिनिर्दिष्ट केलेल्या दराने करमणूक शुल्क आणि या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमाच्या कलम ३-अअ, पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने अधिभार.

(२) १ जानेवारी, १९८४ पासून सुरू होणा-या व ३१ मार्च १९८४ रोजी संपणा-या मुदतीसाठी शुल्क आणि अधिभार भरण्यास पात्र असलेला मालक,—

(एक) फिरता सिनेमा व व्हिडिओ प्रदर्शन याबाबतीत, मुंबई करमणूक शुल्क नियम, १९५८ च्या नमुना ब मध्ये, विहित अधिका-याकडे विवरण दाखल करील; त्यामध्ये इतर गोष्टीबरोबरच, प्रत्येक प्रयोगास, जागेच्या प्रत्येक वर्गासाठी असलेल्या तिकिटांच्या विक्रीचा तपशील आणि त्याबाबतचे शुल्क व अधिभार दर्शवण्यास येईल. मुंबई करमणूक कर (सुधारणा आणि पूर्वलक्षी प्रभावाने कर बसविणे) अधिनियम, १९८४ हा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत हे विवरण दाखल करण्यात येईल. मालक हा, पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून, अशा विवरणांनुसार देय शुल्काची व अधिभाराची रक्कम विहित अधिका-याकडे विवरणासह रोख रकमेच्या किंवा चेकच्या किंवा चलनाच्या रुपाने देईल. १९८४ चा महा. ११.

(दोन) व्हिडिओ खेळांच्या बाबतीत, मालक, मुंबई करमणूक कर (सुधारणा आणि पूर्वलक्षी प्रभावाने कर बसविणे) अधिनियम, १९८४ हा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक-महिन्याच्या आत, पोट-कलम (३) च्या तरतुदींच्या अधीन राहून देय शुल्काची ठोक रक्कम व अधिभाराची रक्कम रोखीने, चेकने किंवा चलानाने भरील : १९८४ चा महा. ११.

परंतु, कोणतेही व्हिडिओ खेळ यंत्र, १ जानेवारी, १९८४ पासून सुरू होणा-या व ३१ मार्च १९८४ रोजी संपणा-या मुदतीमधील कोणत्याही एक किंवा अनेक दिवशी बंद किंवा करमणुकीच्या संदर्भात अनुत्पादक राहिले असेल त्या बाबतीत, विहित अधिकारी हा, ते यंत्र बंद किंवा अनुत्पादक राहिले असल्याची खात्री पटल्यानंतर, अशा रीतीने बंद किंवा अनुत्पादक राहणा-या यंत्राबाबत व्हिडिओ खेळांच्या दुकानाच्या मालकास, शुल्कामध्ये प्रमाणशीर सूट किंवा परतावा मंजूर करील :

आणखी असे की, अशा कोणत्याही मालकाला अनुतोष मागण्याचा हक्क आहे ही गोष्ट सिद्ध करण्याची जबाबदारी त्या मालकावर राहील.

(३) मुंबई करमणूक शुल्क (सुधारणा) अध्यादेश, १९८३ च्या तरतुदींनुसार, फिरत्या सिनेमाच्या किंवा व्हिडिओ प्रदर्शनाच्या किंवा व्हिडिओ खेळ घराच्या कोणत्याही मालकाने कोणतेही शुल्क व अधिभार भरला असेल त्या बाबतीत, अशा मालकास, अशा रीतीने भरलेली रक्कम पोट-कलम (२), खंड (एक) अन्वये सादर करावयाच्या विवरणामध्ये आणि त्या विवरणानुसार भरावयाच्या रकमेमध्ये किंवा, यथास्थिती, खंड (दोन) अन्वये रक्कम भरताना, समायोजित करण्याचा हक्क राहील आणि अशा रीतीने भरलेली कोणतीही रक्कम जादा असेल तर, ती त्याच्या विकल्पानुसार, त्याला परत करता येईल किंवा या अधिनियमाद्वारे सुधारित मुख्य अधिनियमाच्या तरतुदींनुसार, १ एप्रिल, १९८४ पासून त्याच्याकडून देय होणा-या शुल्काच्या व अधिभाराच्या स्वरुपात समायोजित करता येईल. १९८३ चा महा. अध्या. २२.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीचा, अशा कोणत्याही मालकाच्या, या अधिनियमाद्वारे सुधारित मुख्य अधिनियमानुसार १ एप्रिल, १९८४ पासून पुढे करमणूक शुल्क व अधिभार भरण्याच्या दायित्वावर परिणाम होणार नाही.

४. [१][(१) या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त करमणुकीशी संबंध असलेले कोणतेही काम बजावणा-या किंवा कोणत्याही कायद्यान्वये सोपवलेले काम बजावणा-या व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस, करमणुकीच्या कोणत्याही स्थानात [२][ विधिग्राह्य छापील तिकिटावाचून किंवा मानार्थ तिकिटावाचून प्रवेश देण्यात येणार नाही.]] वसुलीची रीत.

(२) [३][ ज्या करमणुकीच्या बाबतीत कलम ३ अन्वये करमणूक शुल्क देय असेल अशा कोणत्याही करमणूक कार्यक्रमाचा मालक, प्रत्येक कॅलेंडर वर्षाच्या पंधरा जानेवारीपर्यंत, देय झालेले आणि देय असलेले करमणूक शुल्क प्रदान करण्यास त्याला परवानगी मिळण्यासाठी विहित अधिका-याकडे अर्ज करील आणि विहित अधिकारी असा अर्ज मिळाल्यानंतर, राज्य शासन त्या बाबतीत काढलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा शर्तींच्या आधारे मालकाला देय करमणूक शुल्काची रक्कम चुकती करण्याची परवानगी देईल :— ]

(क) करमणुकीच्या स्थानात प्रवेश देण्याबद्दल व शुल्काबद्दल मालकास मिळालेल्या ठोक रकमेवर [४][[५][ राज्य ] शासन ] जे टक्केवारी प्रमाण ठरवील त्या प्रमाणात एकत्रित रक्कम भरून;

(ख) करमणुकीच्या स्थानात प्रवेश देण्याबद्दल व शुल्काबद्दल मिळालेल्या रकमांच्या विवरणास अनुसरून;

(ग) प्रवेश दिलेल्या व्यक्तींची संख्या ज्यायोगे आपोआप नोंदली जाते अशा कोणत्याही यांत्रिक साधनाद्वारे नोंद करण्यात आलेल्या संख्येस अनुसरून :

[६][ परंतु, राज्य शासनास, स्वतःहोवून, **शासकीय राजपत्रातील** सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही करमणूक कार्यक्रमाच्या किंवा करमणूक कार्यक्रमाच्या वर्गाच्या मालकाला, यथास्थिती, खंड (ब) आणि (क) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही यांत्रिक साधनाने नमूद केलेल्या संख्येस अनुसरून, देय शुल्काची रक्कम देण्याचा निदेश देता येईल; ]

[७][ परंतु आणखी असे की, विहित अधिकारी, वर सांगितल्याप्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, अर्जदाराला त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन आणि फेटाळण्याची कारणे नमूद करून, तो अर्ज फेटाळील. ]

(३) ज्या करमणुकीच्या बाबतीत पोट-कलम (२) च्या तरतुदीस अनुसरून समुचित शुल्क देय होत असेल अशा कोणत्याही करमणुकीस या कलमाच्या पोट-कलम (१) च्या आणि कलम ५ च्या तरतुदी लागू होणार नाहीत.

[ **४.क** १ मे १९६० नंतर विवक्षित कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या, मुंबई सरकारच्या मुद्रांकांचा उपयोग करणे.] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम ७ च्या कलम ६ अन्वये वगळण्यात आले.

१ मे १९६० नंतर विवक्षित कालावधीसाठी अनुज्ञेय असलेल्या, मुंबई सरकारच्या मुद्रांकांचा उपयोग करणे.

[८][ **४-ख** (१) कलम ३ अन्वये ज्या बाबतीत करमणूक शुल्क देय असेल अशा कोणत्याही करमणुकीच्या बाबतीत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये जी विवरणे प्रस्तुत करणे आवश्यक आहे ती बिनचूक आणि परिपूर्ण आहेत अशी राज्य शासनाची खात्री झाल्यास, शासनाने, अशा विवरणांच्या आधारे, करमणूक शुल्काची येणे रक्कम निर्धारित केली पाहिजे. ] करमणूक शुल्काचे निर्धारण.

---

[१] सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ५ अन्वये " तिकिटावर राज्य शासनाने महसुलाच्या प्रयोजनाकरिता काढलेले योग्य ते करमणूक शुल्क भरण्यात आले आहे असे दर्शविणारा, वठविलेला, उमटविलेला, कोरलेला किंवा चिकट (पूर्वी न वापरलेला) मुद्रांक असेल अशा तिकिटावाचून प्रवेश देण्यात येणार नाही " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५ (अ) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन विमर्शाधीन आदेशाअन्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या मजकुराऐवजी " राज्य शासन " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेश १९५० या अन्वये "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[८] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ३ अन्वये कलम ४ (ब) दाखल करण्यात आले.

(२) कोणत्याही करमणुकीच्या स्थानाच्या मालकाने प्रस्तुत केलेली विवरणे ही बिनचूक व परिपूर्ण आहेत याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली नसल्यास, आणि मालकाला उपस्थित राहण्याबद्दल किंवा आणखी पुरावा सादर करण्याबद्दल फर्माविणे आवश्यक आहे असे राज्य शासनास वाटत असल्यास, राज्य शासनाने नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस व अशा ठिकाणी अशा मालकास एकतर उपस्थित राहण्यासाठी व त्याच्या विवरणांच्या पुष्ट्यर्थ तो ज्या पुराव्यावर विसंबून असेल असा सर्व पुरावा सादर करण्यासाठी किंवा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आला असेल असा पुरावा सादर करण्यासाठी फर्माविणारी नोटीस, त्या मालकावर, विहित केलेल्या रीतीने बजावली पाहिजे. नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाला किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य शासनाने, दाखल करण्यात येईल असा सर्व पुरावा विचारात घेऊन, मालकाकडून येणे असलेल्या करमणूक शुल्काची रक्कम निर्धारित केली पाहिजे.

(३) मालकाने नोटिशीतील अटी पूर्ण करण्यात कसूर केली तर, राज्य शासनाने, आपल्या पराकाष्ठा निर्णय शक्तीनुसार [१][ असमाधानकारक असे विवरण सादर केल्याच्या लगतपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत मालकाने दिलेल्या शुल्काची रक्कम, करमणुकीचे स्थान चालविण्याकरिता येणारा मासिक खर्च आणि अशा शुल्काची रक्कम निश्चित करण्याकरिता विचारात घ्यावा लागणा-या इतर कोणत्याही संबंधित बाबी विचारात घेऊन ] करमणूक शुल्काची रक्कम निर्धारित केली पाहिजे.

(४) एखाद्या मालकाने पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही करमणुकीच्या स्थानाच्या संबंधात त्याबाबतीत विहित केलेल्या वेळेच्या आत विवरणे प्रस्तुत केली नाही तर, राज्य शासनाने मालकाला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर [२][ आणि विवरणे सादर न केल्याच्या लगतपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत मालकाने दिलेल्या शुल्काची रक्कम, करमणुकीचे स्थान चालविण्याकरिता येणारा मासिक खर्च आणि त्याबाबतीत विचारात घ्यावा लागणा-या इतर कोणत्याही संबंधित बाबी विचारात घेऊन ] त्याच्याकडून येणे असलेली करमणूक शुल्काची रक्कम, आपल्या पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार, निर्धारित केली पाहिजे आणि अशा रीतीने निर्धारित केलेल्या शुल्काच्या रकमेशिवाय, त्या रकमेच्या दीडपटीहून अधिक नसेल इतकी रक्कम मालक शास्ती म्हणून देईल असा निदेशसुद्धा, राज्य शासनास देता येईल.

(५) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही निर्धारणामुळे, या अधिनियमाखालील एखाद्या गुन्ह्याबद्दलच्या कोणत्याही खटल्यास हानी पोहोचणार नाही.

व्हिडिओ खेळघरातील यंत्र चालू नसेल आणि अनुत्पादक अवस्थेत असेल त्या बाबतीत माफी किंवा परतावा देणे.

[३][ ४-ग (१) ज्या बाबतीत, व्हिडिओ खेळघरामध्ये, बसवण्यात आलेल्या एकूण यंत्रांवर, दरमहा प्रत्येक यंत्रामागे, व्हिडिओ खेळाच्या संबंधात कोणतेही करमणूक शुल्क देय असेल त्याबाबतीत, ते शुल्क ज्या महिन्यासाठी किंवा ज्या महिन्याच्या भागासाठी देय असेल त्या संपूर्ण महिन्यात किंवा त्या महिन्याच्या भागात आणि कोणतेही यंत्र बंद असेल किंवा कोणताही कार्यक्रम करण्याच्या दृष्टीने अनुत्पादक असेल तर, विहित प्राधिका-याने, ज्या कालावधीत ते यंत्र बंद असेल किंवा अनुत्पादक असेल त्या कालावधीसाठी त्या प्रमाणात शुल्क माफ केले पाहिजे किंवा त्या शुल्काचा परतावा दिला पाहिजे :

परंतु, विहित अधिका-याला, ते यंत्र अशा प्रकारे बंद आहे किंवा अनुत्पादक आहे अशा अर्थाची लेखी नोटीस दिलेली असल्याशिवाय, कोणतीही अशी माफी किंवा परतावा देता कामा नये आणि अशी नोटीस स्वाधीन केल्याच्या किंवा प्रेषण प्रमाणपत्रान्वये डाकेने नोटीस पाठवल्याच्या तारखेपूर्वीच्या कोणत्याही मुदतीसाठी कोणतीही माफी किंवा असा परतावा देता कामा नये.

---

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ७(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७(ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ अन्वये कलम ४ (ग) समाविष्ट करण्यात आले.

(२) ज्या कोणत्याही व्यक्तीला या कलमान्वये ज्या वस्तुस्थितीवरून आपणास अनुतोष मागण्याचा हक्क आहे असे वाटत असेल ती वस्तुस्थिती सिद्ध करण्याची जबाबदारी त्या व्यक्तीवर असेल.]

गो-कार्टींग केंद्रातील चालू नसलेल्या किंवा उत्पन्न न मिळणा-या कारच्या बाबतीत सूट किंवा परतावा.

[1][ ४.घ (१) जेव्हा गो-कार्टींग केंद्रामध्ये चालू असलेल्या कारच्या एकूण संख्येवर प्रति कार प्रति महिना २,००० रुपये या दराने गो-कार्टींगच्या बाबतीत करमणूक शुल्क देय असेल आणि जर, एखादी कार संपूर्ण महिनाभर किंवा असे शुल्क देय असणा-या महिन्याच्या काही कालावधीमध्ये कोणत्याही करमणूक कार्यक्रमासाठी चालू नसेल आणि तिच्यापासून उत्पन्न मिळालेले नसेल तर, ज्या कालावधीसाठी ती कार अशाप्रकारे चालू नसेल आणि तिच्यापासून उत्पन्न मिळालेले नसेल तर त्या कालावधीच्या प्रमाणानुसार विहित अधिकारी शुल्कात सूट देईल किंवा शुल्काचा परतावा देईल :

परंतु, एखादी कार संपूर्ण महिनाभर किंवा महिन्याच्या काही कालावधीमध्ये अशा प्रकारे चालू नव्हती आणि तिच्यापासून कोणतेही उत्पन्न मिळाले नाही, अशी लेखी नोटीस, ती अशी चालू नसण्याच्या किंवा तिच्यापासून उत्पन्न न मिळण्याच्या तपशिलांसह, विहित अधिका-याकडे व्यक्तिशः दिल्याशिवाय आणि त्याची पोचपावती घेतल्याशिवाय किंवा टपाल दाखला घेऊन दिल्याशिवाय अशी कोणतीही सूट किंवा परतावा दिला जाणार नाही आणि अशी कोणतीही सूट किंवा परतावा अशा पोचपावतीच्या किंवा टपाल दाखला प्रमाणपत्राच्या दिनांकापूर्वीच्या कालावधीकरिता अनुज्ञेय असणार नाही.

(२) या कलमान्वये अशाप्रकारे सूट मिळण्यासाठी दावा करण्याचा एखाद्या व्यक्तीस हक्क प्राप्त होण्यासाठी एखादी कार चालू नव्हती किंवा तिच्यापासून कोणतेही उत्पन्न मिळाले नाही, हे सिद्ध करण्याचे बंधन अशा व्यक्तीवरच राहील.

जाहीर लिलाव किंवा एजंट या मार्फत केबल दूरचित्रवाणीवरील शुल्काची वसुली.

४.ङ (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, एका वेळी तीन वर्षांपेक्षा जास्त नाही अशा कोणत्याही कालावधीकरिता, थेट घरपोच (डीटीएच) प्रसारण सेवेवरील आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क, जाहीर लिलावाद्वारे पट्ट्याने देणे किंवा त्याच्या वसुलीकरिता एजंट नियुक्त करणे हे राज्य शासनासाठी कायदेशीर असेल.

(२) जेथे थेट घरपोच प्रसारण सेवेवरील (डीटीएच) आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसूल करणे अशाप्रकारे पट्ट्याने दिले असेल किंवा जेथे अशाप्रकारे एजंट नियुक्त करण्यात आला असेल तेथे पट्टेदाराने किंवा एजंटाने कामावर ठेवलेली व्यक्ती पट्ट्याच्या शर्तीच्या किंवा, यथास्थिति, एजन्सीच्या कराराच्या अधीनतेने, घरपोच प्रसारण सेवेवरील आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसूल करण्यासाठी राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी व कर्मचारी यांना या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर आणि त्यांच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्यांचे पालन, त्याबाबतीत विहित अधिका-याने त्यांना यथोचितरीत्या प्राधिकृत केल्यानंतर करतील.

(३) राज्य शासनाने, याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे वेळोवेळी काढलेल्या निदेशांच्या अधीनतेने, कोणतेही असल्यास, विहित अधिकारी थेट घरपोच (डीटीएच) प्रसारण सेवेवरील आकारणीयोग्य करमणूक शुल्कासह केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्क वसुलीचे, अशा पट्टेदारामार्फत किंवा एजंटामार्फत, विहित करण्यात येईल, अशा रीतीने व कार्यपद्धतीनुसार नियमन करील.]

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

कलम ४ चे अनुपालन न केल्याबद्दल शिक्षा.

५. कोणत्याही व्यक्तीस करमणुकीच्या कोणत्याही स्थानात [1][***] प्रवेश देण्यात आला असेल व असा प्रवेश देताना कलम ४ च्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आले नसेल तर, ज्या करमणुकीच्या स्थानात अशा व्यक्तीस प्रवेश देण्यात आला असेल त्या करमणुकीच्या स्थानाच्या मालकास दंडाधिका-यासमोर सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर, तो प्रत्येक अपराधाबद्दल [2][कमीत कमी पाचशे रुपये आणि जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यन्तच्या] दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. आणि जे शुल्क भरावयास पाहिजे होते ते भरण्यास तो पात्र होईल.

इतर तरतुदींचे अनुपालन न केल्याबद्दल शिक्षा.

[3][५. क जी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या तरतुदींपैकी, ज्या तरतुदींच्या उल्लंघनाबद्दल या अधिनियमात इतर कोणत्याही शिक्षेची तरतूद करण्यात आलेली नाही, अशा कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिद्धीनंतर [4][सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कैदेची किंवा [5][कमीत कमी दोन हजार रुपये आणि जास्तीत जास्त पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल] किंवा या दोन्ही शिक्षा होतील.] ]

धर्मादाय किंवा शैक्षणिक प्रयोजनासाठी असलेल्या करमणुकीच्या बाबतीत सूट ;

६. (१) ज्या बाबतीत कोणत्याही करमणुकीच्या संबंधात [6][ जिल्हाधिका-याची ] अशी खात्री होईल की,--

(क) अशा करमणुकीपासून मिळालेले संपूर्ण उत्पन्न, करमणुकीचा कोणताही खर्च अशा उत्पन्नावर न आकारता, लोककल्याणाच्या किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी वाहिलेले आहे ; किंवा

(ख) करमणूक ही सर्वस्वी शैक्षणिक स्वरूपाची आहे ; किंवा

[7][[8][ राज्य शासनाने ] दिलेली सूट.

(ग) अशी करमणूक फायद्यासाठी चालविण्यात न येणा-या किंवा त्यासाठी स्थापन करण्यात न आलेल्या एखाद्या संस्थेकडून, परिसंस्थेकडून किंवा समितीकडून अंशतः शैक्षणिक किंवा अंशतः शास्त्रीय प्रयोजनांसाठी करविलेली आहे ;

त्याबाबतीत कोणत्याही करमणुकीच्या कार्यक्रमांत प्रवेशासाठी दिलेल्या पैशांवर करमणूक शुल्क बसवले जाता कामा नये.

(२) एखाद्या करमणुकीपासून मिळालेले संपूर्ण निव्वळ उत्पन्न लोककल्याणाच्या किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी वाहण्यात आले आहे आणि त्या करमणुकीचा संपूर्ण खर्च उत्पन्नाच्या रकमेच्या वीस टक्क्यांपेक्षा अधिक नाही याबद्दल [9][जिल्हाधिका-याची] खात्री झाल्यास, त्या करमणुकीसाठी भरलेली शुल्काची रक्कम मालकास परत दिली पाहिजे.

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ३८, कलम ५ अन्वये " पैसे घेऊन " हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ८ अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या " या मजकुरांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम ३ (इ) अन्वये कलम ५ (क) दाखल करण्यात आले.

[4] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ८ अन्वये " पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ९ अन्वये " दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४(१) अन्वये "ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्ताची नेमणूक झालेली आहे अशा कोणत्याही क्षेत्रांत पोलीस आयुक्ताची किंवा इतरत्र जिल्हा दंडाधिका-याची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेशा अन्वये "गव्हर्नर इन कौन्सिल " या मजकुराऐवजी " राज्य शासन " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेशा १९५० या अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४(२) अन्वये " पोलीस आयुक्ताची किंवा, यथास्थिती, जिल्हा दंडाधिका-याची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) [१][ [२][राज्य] शासनास,] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही करमणुकीच्या किंवा करमणुकीच्या कोणत्याही वर्गाच्या बाबतीत, [३][आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही अटी असल्यास, त्या अटींना आणि शर्तींना अधीन राहून] करमणुकीच्या दायित्वातून सूट देता येईल.

[४][**स्पष्टीकरण**.— या कलमात, एखाद्या करमणुकीपासूनची आवक किंवा निव्वळ उत्पन्न याचा विनियोग, अनुसूचित जातींच्या किंवा अनुसूचित जमातींच्या हितासाठी किंवा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग म्हणून राज्य शासनाने जाहीर केलेल्या नागरिकांच्या कोणत्याही वर्गाच्या प्रगतीसाठी, परंतु इतर कोणत्याही वर्गाच्या, पंथाच्या किंवा समाजाच्या हितासाठी किंवा कोणत्याही धार्मिक कारणासाठी नव्हे- करण्यात आला असेल तर अशी आवक किंवा निव्वळ उत्पन्न लोककल्याणाच्या किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी वाहिलेले असल्याचे समजण्यात येईल.]

७. (१) [१][ [२][राज्य] शासनास] करमणूक शुल्काचा भरणा निश्चितपणे प्राप्त करून घेण्यासाठी व सामान्यतः या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आणि विशेषतः पुढील गोष्टींसाठी नियम करता येतील :— नियम करण्याचा अधिकार.

(क) [५][ * * * ]

(ख) एकाहून अधिक व्यक्तींना प्रवेश देणा-या तिकिटांचा उपयोग करणे व त्यांवरील शुल्काची गणना करणे आणि करमणुकीच्या स्थानामधील एका भागातून दुस-या भागात गेल्यावर द्यावयाच्या रकमेवर किंवा असणे अथवा इतर जागा यांबाबत दिलेल्या रकमेवर शुल्क भरणे ;

(ग) यांत्रिक साधनांच्या वापरावर नियंत्रण ठेवणे (यात वेगवेगळ्या रकमा भरण्यासाठी एकाच यांत्रिक साधनाचा उपयोग करण्यास प्रतिबंध करण्याचा समावेश होतो) आणि यांत्रिक साधनांच्याद्वारे प्रवेश दिलेल्या व्यक्तींची योग्य नोंद होण्याची निश्चिती करून घेणे.

[६][ * * * ]

(घ) ज्या करमणुकीच्या बाबतीत कलम ४, पोट-कलम (२) याच्या तरतुदीनुसार समुचित शुल्क देय होत असेल त्या करमणुकीच्या स्थानाच्या मालकांकडून किती व्यक्तींना प्रवेश देण्यात आला ते पडताळून पाहणे, हिशेब ठेवला जाणे व विवरणे प्रस्तुत केली जाणे ; [७][आणि कलम ४, पोट-कलम (२) अन्वये शुल्काच्या रकमेचा भरणा करण्याबद्दल प्रतिभूती देण्यास अशा मालकांना फर्माविणे व अशी प्रतिभूती सरकारजमा होण्याबाबतच्या शर्ती विहित करणे ;]

[८][(घक) कलम ४-ब, पोट-कलम (२) अन्वये नोटीस बजावण्याची रीत आणि त्या कलमान्वये पराकाष्ठा निर्णयशक्तीनुसार निर्धारण करण्याकरिता अनुसरावयाची कार्यपद्धती ;]

[५][ * * * ]

---

[१] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेश अन्वये " गवर्नर इन कौन्सिल " या मजकुराऐवजी राज्य शासन हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेश १९५० या अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ४ अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १० (अ) अन्वये खंड (क) व (ङ) हे वगळण्यात आले.

[६] सन १९५० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ६ अन्वये खंड (ग.ग) हे वगळण्यात आले.

[७] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम ५ (१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ५ (१) अन्वये खंड (घक) समाविष्ट करण्यात आला.

[१][(च) कलम ३, पोट-कलम (३) खाली देय असलेली शुल्काची रक्कम देण्यासाठी आणि तिच्यातून सूट मिळण्यासाठी अटी आणि नमुना विहित करणे ;

(छ) करमणूक शुल्काबाबत सूट मिळण्यासाठी किंवा भरलेल्या शुल्काची रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज सादर करणे व ते निकालात काढणे ;

[२][(ज) कोणत्याही राष्ट्राच्या संरक्षक दलातील सैनिक, नौसैनिक आणि वायुसैनिक यांना, ते करमणुकीच्या कार्यक्रमास गणवेश परिधान करून हजर असतील तर, किंवा त्यांनी साध्या पोषाखात असताना ओळखपत्र दाखविल्यास, करमणूक करातून सूट देणे ;]

[३][(झ) करमणुकीच्या स्थानाच्या मालकाने, ज्यांना करमणुकीच्या संबंधातील, कोणतीही कर्तव्ये किंवा कायद्यान्वये त्यांच्यावर सोपविलेले इतर कोणतेही कर्तव्य बजावावयाचे असेल, अशा अधिका-यांना, करमणुकीच्या स्थानात प्रवेश करण्याकरिता, प्रवेशपत्रिका देणे.]

[४][(ञ) (१) घरपोच प्रसारण सेवेसह (डीटीएच) केबल दूरचित्रवाणीवरील करमणूक शुल्काची वसुली जाहीर लिलावाद्वारे करणे.]

(२) कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही नियमांचे उल्लंघन करील किंवा त्यांचे अनुपालन करण्यात कसूर करील तर, अपराधसिद्धीनंतर, तिला [५][सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

(३) असे नियम, पूर्व प्रसिद्धीनंतर करण्यात येतील.

[६][(४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा असा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि असा निर्णय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून तो नियम केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिती, तो नियम अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा रद्द करण्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता करमणुकीच्या स्थानात प्रवेश करण्याचा अधिकार.

[७][८. (१) आयुक्ताला किंवा जिल्हाधिका-याला किंवा याबाबतीत त्यांच्यापैकी एकाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या, अव्वल कारकुनाच्या दर्जाहून कमी दर्जा नसेल अशा कोणत्याही महसूल अधिका-याला किंवा राज्य शासनाने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याला (या कलमामध्ये यापुढे ज्याला [ निरीक्षक अधिकारी ] असे संबोधण्यात आले आहे) त्याच्या अधिकारितेच्या क्षेत्राच्या संबंधात, या

[१] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १० (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ९ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३ (क) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ७ अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ५ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ५ (२) अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[७] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ११ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ८ दाखल करण्यात आले.

अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तदन्वये केलेल्या नियमांचे अनुपालन केले जात आहे किंवा कसे हे पाहण्यासाठी, करमणुकीचा प्रयोग चालू असताना किंवा अन्य वेळी करमणुकीच्या कोणत्याही स्थानात निरीक्षण पार पाडण्याच्या हेतूने कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करता येईल.

(२) निरीक्षक अधिका-यास, कोणत्याही मालकाला, त्याने चालविलेल्या करमणुकीच्या प्रयोगासंबंधीचे कोणतेही लेखे किंवा कागदपत्रे त्याच्यासमोर सादर करण्यास फर्माविता येईल किंवा पुढील गोष्टी संबंधातील कोणतीही माहिती सादर करण्यास फर्माविता येईल :—

(एक) प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमा, तिकिटे किंवा मुदती तिकिट्टे (सीझन तिकिटे) किंवा मानार्थ तिकिटे किंवा अशा करमणुकीच्या प्रयोगाच्या संबंधातील इतर कोणत्याही वस्तू आणि बाबी,

(दोन) करमणुकीचे प्रयोग चालविण्यासंबंधीच्या मासिक खर्चाचा तपशील.

(तीन) मालकाने संबंधित चित्रपट वितरकाकडे पाठविलेल्या तिकिट विक्रीचे दैनिक विवरणपत्र; तसेच नियतकालिक विवरणपत्र; आणि .

(चार) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल त्याप्रमाणे, करमणुकीच्या प्रयोगाचे पास, तिकिटे छापण्यासाठी संबंधित मुद्रणालयाकडे नोंदविलेल्या मागण्यांचा तपशील.

(३) पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचे सर्व लेखे आणि कागदपत्रे, तसेच मालकाने चालविलेल्या करमणुकीच्या प्रयोगासंबंधी माहिती अंतर्भूत असलेली कागदपत्रे ही सर्व वाजवी वेळेत, निरीक्षक अधिका-यास निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात येतील आणि निरीक्षक अधिका-यास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यास आवश्यक वाटतील अशा त्यांच्या प्रती किंवा त्यांतील उतारे घेता येतील किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल किंवा त्यावर ओळखीसाठी खुणा करता येतील किंवा करण्याची व्यवस्था करता येईल.

(४) निरीक्षक अधिका-यास, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्यास आवश्यक वाटेल अशा कालावधीसाठी, या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी त्याच्यापुढे सादर केलेले कोणतेही लेखे किंवा इतर कागदपत्रे व वस्तू, मालकाला त्याची पावती दिल्यानंतर अटकावून ठेवता येतील व स्वतःच्या अभिरक्षेत ठेवून घेता येतील.

(५) कोणत्याही मालकाने त्याच्याकडून येणे असलेल्या शुल्काची रक्कम चुकविली आहे किंवा चुकवण्याचा प्रयत्न केला आहे असे निरीक्षक अधिका-यास सकारण वाटेल तर त्यास, त्याची कारणे लेखी नमूद करून, आवश्यक असतील असे मालकाच्या ताब्यातील लेखे किंवा कागदपत्रे किंवा वस्तू जप्त करता येतील आणि त्याची पावती देता येईल व या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात आवश्यक असेल तेवढ्या कालावधीसाठी ती ठेवून घेता येतील.

(६) पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (५) च्या प्रयोजनार्थ निरीक्षक अधिका-याला, कोणत्याही मालकाच्या करमणुकीच्या किंवा धंद्याच्या कोणत्याही जागी किंवा मालक, त्याने चालविलेल्या करमणुकीच्या प्रयोगाशी संबंध असलेले कोणतेही लेखे किंवा कागदपत्रे जेथे ठेवतो किंवा त्यावेळी ठेवत आहे, असे निरीक्षक अधिका-यास सकारण वाटेल अशा इतर कोणत्याही जागी किंवा मालकाने करमणुकीसाठी तिकिटे छापण्याचे काम ज्या मुद्रणालयाकडे सोपविलेले आहे त्या मुद्रणालयात, प्रवेश करता येईल व त्यांची झडती घेता येईल आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीसाठी किंवा कार्यवाहीच्या संबंधात निरीक्षक अधिका-यांच्या मते उपयुक्त ठरतील अशा, कोणत्याही झडतीच्या वेळी मिळालेल्या, कोणत्याही वस्तुंची किंवा गोष्टींची नोंद करता येईल किंवा वस्तुसूची करता येईल. या पोट-कलमान्वये निरीक्षक अधिका-याने कोणत्याही वेळी
१९७४ घेतलेल्या झडतीच्या बाबतीत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी शक्य होईल तेथवर लागू होतील.
चा २.

(७) करमणुकीच्या स्थानाचा मालक, निरीक्षक अधिका-यास या कलमान्वये तो आपली कर्तव्ये पार पाडत असताना त्यास लागेल अशी प्रत्येक प्रकारची वाजवी मदत देईल.

(८) कोणत्याही करमणुकीच्या स्थानाचा मालक किंवा इतर कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) अन्वये यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या निरीक्षक अधिका-यास, प्रवेश करताना प्रतिबंध किंवा अडथळा करील किंवा कोणतीही वाजवी मदत देण्यात कसूर करील तर त्याला, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये तो ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र असेल त्या शिक्षेव्यतिरिक्त आणखी दोन हजार रूपयांपर्यन्त असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(९) प्रत्येक निरीक्षक अधिकारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ मधील अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल. १८६० चा ४५.

(१०) निरीक्षक अधिका-याला, आकस्मिक निकडीच्या बाबतीत, निरीक्षणाच्या किंवा करमणुकीच्या स्थानावर अधिकारिता असलेल्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिका-यास, करमणुकीसाठी जागेचा कोणताही अनधिकृत वापर करण्यास प्रतिबंध करण्याची किंवा करमणुकीच्या जागी कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची किंवा त्या जागेतील किंवा या अधिनियमाखालील इतर कोणत्याही जागेतील चौकशीच्या प्रयोजनाकरिता संबंधित अभिलेखांचा शोध घेण्याची विनंती करता येईल. पोलीस ठाण्याच्या अशा अधिका-यास या विनंतीचे अनुपालन करणे बंधनकारक असेल :

मात्र, असा अधिकारी उपलब्ध झाला नाही तर, निरीक्षक अधिका-यास, आवश्यक ती मदत मिळण्यासाठी जवळच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिका-यास विनंती करता येईल.]

वसुली. ९. करमणूक शुल्क म्हणून येणे असलेली कोणतीही रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

अपराध आपसात मिटविणे. [१][ ९.क [२][ (१) याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास, जिने या अधिनियमाविरूद्ध किंवा तद्न्वये करण्यात आलेल्या नियमांविरुद्ध अपराध केला असेल किंवा असा अपराध केला असल्याचा जिच्यावर वाजवी संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीकडून असा अपराध आपसात मिटविण्यासाठी :-

(क) असा अपराध या अधिनियमान्वये देय असलेले कोणतेही शुल्क देण्यात कसूर केल्याबद्दलचा किंवा शुल्क चुकविण्याबद्दलचा असेल त्याबाबतीत, अशारीतीने देय असलेल्या शुल्काच्या रकमेव्यतिरिक्त, [३][ दोनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम ] किंवा देय शुल्काच्या रकमेची दुप्पट यांपैकी अधिक असेल अशी रक्कम; आणि

(ख) इतर कोणत्याही बाबतीत [४][ कमीत कमी पाचशे रूपये परंतु दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम].] वसूल करता येईल.

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४१, कलम ३ (एच) अन्वये कलम ९ क जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १२ (१) अन्वये कलम ९.क यास त्या कलमाचे पोट-कलम (१) म्हणून नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२(१) (अ) अन्वये " पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२(१) (ब) अन्वये " पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (२) याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-याने, या अधिनियमाविरूद्ध किंवा तदन्वये करण्यात आलेल्या नियमांविरूद्ध केलेल्या अपराधांचे प्रशमन केले असेल त्याबाबतीत, त्याने निश्चित केलेली आपसमेळाची (कंपोझिशन) रक्कम, ज्या दिनांकास ती निश्चित करण्यात आली असेल त्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मालकाला भरावी लागेल आणि उपरोक्त कालावधीमध्ये आपसमेळाची रक्कम देण्यात त्या व्यक्तीने कसूर केल्यास ती रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.]

[२][ **९.ख** मालकाने कलम ३ अन्वये द्यावयाची शुल्काची रक्कम किंवा कलम ९-क अन्वये निश्चित केलेली आपसमेळाची रक्कम विहित कालावधीत देण्यात कसूर केली असेल त्याबाबतीत, तो अशा प्रकारे देय असलेली शुल्काची रक्कम किंवा आपसमेळाची रक्कम या व्यतिरिक्त पहिल्या ३० दिवसांसाठी दरसाल १८ टक्के दराने आणि त्यानंतर अशी रक्कम देय असेल किंवा देय होईल त्या दिनांकापासून रक्कम व व्याज संपूर्ण दिले जाईपर्यंत अशा रकमेवर दरसाल २४ टक्के दराने दंडार्थ व्याजाची रक्कम शासनाला देण्यास पात्र ठरेल.

शुल्क आणि आपसमेळाची रक्कम देण्यात कसूर केल्याबद्दल देय असलेले व्याज.

**९.ग** मालकाने देय असलेल्या शुल्काच्या रकमेपेक्षा जादा करमणूक शुल्क दिलेले असेल त्याबाबतीत जिल्हाधिकारी त्याबाबत मालकाने अर्ज केल्यानंतर आवश्यक ती पडताळणी करून आणि विहित केलेल्या रीतीने अशी जादा दिलेली रक्कम त्यास परत करील.

दिलेल्या अतिरिक्त शुल्काचा परतावा.

**९.घ** मालक या अधिनियमाखाली किंवा तदन्वये तयार केलेल्या नियमाखाली अपराध सतत करीत असल्याचे आढळून आले असेल त्याबाबतीत. जिल्हाधिकारी, अशा रीतीने त्याने केलेल्या अपराधाचे किंवा अपराधांचे गांभीर्य लक्षात घेऊन, अशा मालकाला त्या अधिनियमान्वये दिलेल्या यथास्थिती, चित्रपट लायसन किंवा तिकीट विक्री लायसन, निलंबित करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी, अशा मालकाविरुद्ध कारवाई सुरू करण्याची " मुंबई चित्रपट (नियमन) अधिनियम, १९५३ " च्या तरतुदींअन्वये नियुक्त केलेल्या लायसन प्राधिकरणाकडे शिफारस करील त्यानंतर लायसन प्राधिकरण मालकाविरुद्ध अशी कार्यवाही सुरु करील.

लायसन निलंबित किंवा रद्द करण्यासाठी शिफारस करणे.

[३][ **१०.** या अधिनियमान्वये राज्य शासनास देण्यात आलेले कोणतेही अधिकार व त्याच्यावर लादण्यात आलेली कोणतीही कर्तव्ये राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे ज्या व्यक्तीस अधिकार देईल अशा कोणत्याही व्यक्तीस [४][ [५][ राज्य ] शासन ] विहित करील अशा शर्तींना अधीन राहून, वापरता येतील किंवा पार पाडता येतील.

[४][ [५][ राज्य ] शासनाकडून ] अधिकारांचे प्रत्यायोजन.

[६][ **१०.क** [७][ कलम ३ च्या, पोटकलम १३ अन्वये बहुविध चित्रपटगृह संकुलाचा किमान दर निर्धारित करणा-या किंवा कलम ४-ब अन्वये शास्तीसह किंवा शास्ती न करता संमत केलेल्या आकारणी आदेशामुळे बाधा पोचलेला मालक, आदेश मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत आयुक्ताकडे अपील दाखल करू शकेल :]

अपील व पुनरीक्षण.

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम १२ (२) (अ) अन्वये पोट कलम (२) जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कलमे ९ख, ९ग, व ९घ ही समाविष्ट करण्यात आली.

[३] या कलमाखालील अधिसूचनेकरिता, मुंबई सरकारचे राजपत्र, भाग एक, इंग्रजी पृष्ठ २९७५ वर प्रसिद्ध झालेली शासकीय अधिसूचना, महसूल विभाग क्र. ७२३०-ई, दिनांक १७ डिसेंबर, १९२३ पहा.

[४] भारतीय विधि अनुकूलन विमर्शाधीन आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या मजकुराऐवजी " राज्य शासन " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकुलन विमर्शाधीन आदेश, १९५० या अन्वये " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १४ अन्वये कलम १० क दाखल करण्यात आले.

[१][ परंतु,—

(क) मालकाने, जिल्हाधिका-याकडून निर्धारित करण्यात आलेली शुल्काची निर्विवाद रक्कम आणि शास्ती, कोणतीही असल्यास, दिलेली नसेल तर आयुक्ताकडून कोणतेही अपील दाखल करून घेण्यात येणार नाही;

(ख) आयुक्तास, खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्यास योग्य वाटेल तर लेखी नमूद करावयाच्या कारणांसाठी, जिल्हाधिका-याने निर्धारित केलेले शुल्क किंवा शास्ती, कोणतेही असल्यास, यांची रक्कम देण्यात आलेली नसली तरी अपील दाखल करून घेता येईल आणि आयुक्ताचा त्याच्याकडून अपील दाखल करून घेण्याबाबतचा निर्णय अंतिम असेल.]

(२) आयुक्त, मालकाला त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आकारणीची आणि असल्यास, शास्तीची रक्कम कायम करू शकेल, कमी करू शकेल, तीत वाढ करू शकेल किंवा ती विलोपित करू शकेल किंवा आकारणी रद्द करू शकेल आणि अशा आदेशात दिलेल्या निदेशानुसार नवीन आकारणी करण्यासाठी हे प्रकरण परत जिल्हाधिका-याकडे निर्देशित करू शकेल. त्यानंतर जिल्हाधिकारी, आवश्यक असेल त्याप्रमाणे आणखी चौकशी केल्यानंतर नवीन आकारणी करील आणि अशा नवीन आकारणीच्या आधारे मालकाकडून देय असलेली, शुल्काची आणि असल्यास शास्तीची रक्कम निश्चित करील.]

[२][ २क ] आयुक्त, शक्यतोवर, पोट-कलम (१) खाली दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक अपिलावर असे अपील दाखल करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत निर्णय देईल आणि एखाद्या प्रकरणाच्या बाबतीत, अपिलावर अशा कालावधीत निर्णय देणे शक्य किंवा व्यवहार्य नसेल त्या बाबतीत तो राज्य शासनाला एक लेखी अहवाल सादर करील व त्यात अपिलावर निर्णय घेण्यास लागलेल्या अशा विलंबाची कारणे नमूद करील.]

(३) राज्य शासन, स्वाधिकारे किंवा आयुक्ताचा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत त्याबाबतीत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यानंतर, प्रकरणाचा अभिलेख आणि कार्यवाही मागवून घेईल आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्या प्रकरणात आदेश संमत करून त्याद्वारे आयुक्तांच्या आदेशात फेरबदल करु शकेल, तो कायम करु शकेल किंवा रद्द करू शकेल.]

विवक्षित कार्यवाहीस रोध.

[३][ **११.** (१) या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय, राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(२) अशा कोणत्याही अधिका-याविरूद्ध किंवा कर्मचा-याविरूद्ध या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

मुदत मर्यादा.

**१२.** या अधिनियमान्वये केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात अशी कृती केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यानंतर राज्य शासनाविरूद्ध कोणताही दावा दाखल करता येणार

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ५(क) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५(क) अन्वये पोटकलम (२क) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(एक) अन्वये कलमे ११, १२, १३, १४ व अनुसूची दाखल करण्यात आली.

नाही आणि राज्य शासनाच्या कोणत्याही अधिका-याविरूद्ध किंवा कर्मचा-याविरूद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

स्थानिक प्राधिकरणांना करमणुकींवर कर बसविण्यास मनाई.

**१३.** (१) नगरपालिका, स्थानिक मंडळ, ग्राम पंचायत किंवा इतर स्थानिक प्राधिकरण यांच्याशी संबंधित कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नगरपालिकेने, स्थानिक मंडळाने, ग्रामपंचायतीने किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाने, ज्या क्षेत्रावर संबंधित स्थानिक प्राधिकरणास अधिकारिता असेल अशा क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आल्यानंतर, ज्या करमणुकीवर या अधिनियमान्वये करमणूक शुल्क बसविण्याजोगे असेल त्या करमणुकीवर कोणताही कर बसविता कामा नये.

(२) पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, सिनेमाच्या प्रत्येक खेळावर किंवा प्रयोगावर किंवा खेळांवर किंवा प्रयोगांवर एकाच सरसकट दराने कर बसविणे स्थानिक प्राधिकरणास समर्थ करणा-या कायद्यानुसार कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने असा कर बसविण्यास बाध येणार नाही.

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या प्रयोजनासाठी, " नगरपालिका " म्हणजे या अधिनियमासोबतच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेली संस्था.

निरसन व व्यावृत्ती.

१९५८ चा मुंबई ४१. १९३६ चा मध्य-प्रदेश ३०. १३५५ फसलीचा हैद्राबाद ५. १९४९ चा सौराष्ट्र अध्या. ८.

**१४.** मुंबई करमणूक कर (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५८ याद्वारे, मुंबई राज्याच्या ज्या भागास, हा अधिनियम लागू करण्यात आला आहे त्या भागात तो अंमलात आल्यानंतर मध्यप्रांत आणि व-हाड करमणूक शुल्क अधिनियम, १९३६, करमणूक कर अधिनियम, १३५५ फसली, सौराष्ट्र करमणूक कर अध्यादेश, १९४९ आणि करमणूककराशी संबंधित इतर कोणताही कायदा, त्या भागात अशा प्रारंभापासून निरसित झालेले असतील :

परंतु, अशा निरसनामुळे—

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांच्या आणि कायद्यांच्या पूर्वीच्या अंमलास, किंवा

(ख) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांच्या आणि कायद्यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींविरूद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात केलेल्या कोणत्याही शास्तीस किंवा शिक्षेस, किंवा

(ग) अशा शास्तीच्या किंवा शिक्षेच्या संबंधातील कोणतेही अन्वेषण, न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना

१९५८ चा मुंबई ४१.

यास, बाध येणार नाही, आणि जणू काही मुंबई करमणूक शुल्क (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५८ हा पारित झालाच नव्हता असे समजून असे कोणतेही अन्वेषण, न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती किंवा दंड लादता येईल :

परंतु आणखी असे की, अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमांच्या आणि कायद्यांच्या तरतुदीद्वारे किंवा तदन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई (काढलेल्या अधिसूचना, दिलेली प्राधिकारपत्रे, किंवा प्रदान करण्यात आलेले अधिकार आणि दिलेली सूट) यांसह, ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल आणि या अधिनियमान्वये तीत फेरबदल करण्यात येईपर्यंत, ती निरसित करण्यात येईपर्यंत किंवा सुधारण्यात येईपर्यंत ती त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील, परंतु तीत फरक इतकाच राहील की, हा अधिनियम संबंधित क्षेत्रात अंमलात येण्यापूर्वी त्यात त्यामुळे प्राप्त झालेल्या कोणत्याही दायित्वाच्या संबंधात करावयाची कोणतीही शुल्काची किंवा कराची आकारणी ही

निरसित केलेल्या अधिनियमाद्वारे आणि कायद्याद्वारे किंवा तद्न्वये बसवलेल्या दरांनी करण्यात येईल आणि कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही प्राधिका-यापुढे असलेल्या कोणत्याही निरसित करण्यात आलेल्या अधिनियमांच्या आणि कायद्यांच्या तरतुदींखालील कार्यवाह्या, त्या क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आल्यानंतर या अधिनियमाखालील संबद्ध प्राधिका-याकडे हस्तांतरित झालेल्या असतील आणि तद्नुसार त्या निकालात काढण्यात येतील.

## अनुसूची

(कलम १३ पहा)

(१) मुंबई महानगर पालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ या अन्वये रचना केलेली महानगरपालिका, किंवा — १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रदेश २.

(२) पुढील अधिनियमांन्वये रचना केलेली नगरपालिका :—

(क) मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५. — १९२५ चा मुंबई १८.

(ख) मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रास आणि कच्छ क्षेत्रास लागू असल्याप्रमाणे मुंबई बरो नगरपालिका अधिनियम, १९२५. — १९२५ चा मुंबई १८.

(ग) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१. — १९०१ चा मुंबई ३.

(घ) मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रांस लागू असल्याप्रमाणे मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१. — १९०१ चा मुंबई ३.

(ङ) मध्यप्रांत व व-हाड नगरपालिका अधिनियम, १९२२, किंवा — १९२२ चा मध्यप्रांत व-हाड २.

(च) हैदराबाद जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९५६, किंवा — १९५६ चा हैदराबाद १८.

(३) कटक अधिनियम, १९२४ अन्वये रचना केलेले कटक मंडळ.] — १९२४ चा २.